
पांडुरंग मोरे
दिव्य
आनंदाचा
झरा

# दिव्य आनंदाचा झरा

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा २ मिनिट

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# दिव्य आनंदाचा झरा

लेखक

पांडुरंग नागू मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# दिव्य आनंदाचा झरा

लेखक : पांडुरंग नागू मोरे

एम.कॉम

(१०.८.१९२९ - २०.७.२०१५)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp: 7710980841

APP : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www. Esahitybooks


**प्रकाशन : १० ऑगस्ट २०१८**



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# अल्प परिचय : पांडुरंग नागू मोरे



अण्णा म्हणजे आमचे वडील जाऊन तीन वर्षे झाली या जुलै महिन्यात. त्यांना तसे दीर्घ आयुष्य मिळाले. शेवटची काही वर्षे सोडली तर ते आपल्या कार्यात मग्न होते. खरेतर त्यांना पक्षाघाताचा झटका आला तेव्हाही ते आपल्या आवडत्या विषयावरच म्हणजे स्वामी विवेकानंदांच्या विचारांवर व्याख्यान देत होते. त्यानंतर प्रकृतीने साथ सोडली आणि त्यांचा हा ध्यास सुटला. त्याआधी निवृत्तीनंतर त्यांनी या विषयावर ठिकठिकाणी व्याख्याने दिली. तरूण पिढीस या तेजस्वी विचारांचा वारसा मिळावा या तळमळीतून ते आपली व्याख्याने शाळा कॉलेजांतून अधिकतर ठेवत असत.

विवेकानंद आणि त्यांचे जीवन कार्य आणि तत्वज्ञान हा त्यांच्या आवडीचा विषय होता. अगदी नोकरीत असल्याच्या वेळेपासून ते आध्यात्मिक पुस्तकांचे वाचन नियमित करीत असत. त्यातूनच त्यांची आध्यात्मिक आणि वैचारिक बैठक पक्की होत गेली असावी. नुसते त्यावर थांबता आपल्या सुंदर अक्षरात त्याच्या नोट्स काढून ठेवत. आम्ही मुले लहान होतो तेव्हा ते शनिवार किंवा रविवारी बैठक मारून पानेच्या पाने भरुन नोट्स काढत बसायचे ते चित्र अजूनही डोळयांसमोर येते. अशा नोट्सच्या कित्येक वह्या घरी जमल्या होत्या.

कित्येकदा असे वाटते की अध्यात्म असो की ईश्वरभक्ती.. माणूस बोलतो एक आणि प्रत्यक्ष आयुष्यात त्यातील कशाचे पालन करायची त्याची तयारी नसते. किंबहुना तसे करण्याचे नैतिक बंधनही त्याच्यावर नसावे अशी अपेक्षा तो करीत असतो. पण अण्णा आपल्या तत्वनिष्ठेपासून ढळायचे नाहीत. वैचारिक पाया पक्का असल्याचेच ते लक्षण असावे. आपल्या बीएआरसी च्या नोकरीत ही ते तसेच ताठ मानेने नि ताठ कण्याने राहिले. सरकारी नोकरी, तीही अकाउंट्स विभागातील. त्यातील आमिषे नि राजकारणास तोंड देत त्याच ताठ मानेने ते निवृत्त झाले. निवृत्त होताना हातात फार काही पुंजी होती असे नाही. मालेगाव कॅम्प सारख्या छोट्या गावात त्यांचा जन्म. बालपणी हलाखी पाहून पुढे स्वकष्टाने अगदी एम. कॉम झालेले अण्णा निवृत्त झाले ते या पुढे 'उरलो उपकारापुरता' असा विचार करत. आपला निवृत्तीनंतरचा काळ विवेकानंदांच्या साहित्याचा अधिकाधिक अभ्यास आणि मनन, चिंतन आणि त्यावरील लेखनात ते घालवू लागले. त्यातून त्यांनी विवेकानंद विचारांवरची स्वलिखित पुस्तके प्रकाशित केली. पाठोपाठ व्याख्यानांची कल्पना त्यांना सुचली. साधारणत: पंधरा वर्षे त्यांनी हा उपक्रम चालवला असेल. ठिकठिकाणी ते अशी व्याख्याने देत फिरत असायचे. एरव्ही अकाऊंट्स ठेवत हिशेबाला पक्के असले तरी या कामासाठी कधी जाण्यायेण्याचा खर्चही घ्यायचे नाहीत.

निवृत्तीनंतर असे सारे करायचा विचार कदाचित आधीपासूनच असावा. कारण आपल्या नोट्स ते व्यवस्थित लावून ठेवत असत. त्यातच त्यांनी ज्योतिषशास्त्राच्या वर्गास जाणे सुरू केले. निवृत्तीनंतर मोफत ज्योतिषविषयक सल्ला देणेही त्यांनी सुरू केले. व्याख्याने आर्थिक दृष्टीने काही उपलब्धी देणारी नसतीलही पण ज्योतिषसल्ल्यावर आपल्याकडे पैसे कमावणे सोपे आहे. तरीही काही एका विचाराने ते काही पैसे न घेता सल्ला देत. 'पैसे घेतले की समोरील ग्राहकास आवडेल

ते आणि त्या पद्धतीने सांगणे आले.' आणि 'तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता' हे त्यांचे यावरचे स्पष्टीकरण होते!

व्यक्तिगत आयुष्यात ते अत्यंत साधे होते. आजच्या शो ऑफच्या जगात कदाचित मिसफिट म्हणावेत इतके. परंतु त्यांच्या विचारांची झेप मोठी होती. जेव्हा आमच्या इतर कुटुंबियांत मुलींना लवकर लग्न करून जबाबदारी पार पाडावी .. त्यांना शिक्षण म्हणजे सापाला दूध पाजणे असा दृष्टीकोन होता.. तेव्हा त्यांनी आपल्या तिन्ही मुलींना उत्तम शिक्षण दिले. त्यासाठी तेव्हा बाकी कुटुंबातील विरोधाची पर्वा केली नाही. त्यामुळेच आज आमच्यापैकी एक डॉक्टर तर दुसरी डॉक्टरेट आहे. जीवनाची शिस्त हा त्यांचा आणखी एक विशेष गुण होता. बहुधा त्यातूनच ते सुरूवातीच्या दिवसांतून वर आले असावेत. पक्के विचार आणि त्याला धरून वागणे, तत्वांशी तडजोड न करता आपल्या आतील आवाजाशी प्रामाणिक राहणे ह्यातूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व घडले असावे.

आपल्या समोर कित्येक महान व्यक्ती असतात. सर्वच व्यक्ती काही अशा उंचीच्या नसतात. महापुरुष अपवादात्मकच असतात. अण्णा एखादे महापुरुष होते असे नाही. पण एक सामान्य व्यक्ती आपल्या मेहनतीच्या जोरावर, जीवनाच्या एक प्रकारच्या शिस्तबद्धतेने आणि तत्वनिष्ठेस धरून समाजासाठी आपला खारीचा वाटा कसा उचलू शकते याचे ते मूर्तिमंत उदाहरण होते.

*****

'दिव्य आनंदाचा झरा' हे आध्यात्मिक विचारांचे पुस्तक काही वर्षांपूर्वी प्रकाशित झाले होते. त्यानंतर हे पुस्तक सर्वांना उपलब्ध व्हावे म्हणून इ साहित्यच्या व्यासपीठावर टाकत आहोत.

या खेरीज 'द्रष्टा संन्यासी विवेकानंद' 'परमहंसांचा होमा पक्षी विवेकानंद' 'Swami Vivekanand and his mission' ही विवेकानंद विचारांची पुस्तके आणि 'नव्या मानवतेकडे' हे मेहेरबाबांवरील पुस्तक प्रकाशित झालेली आहेत. कालांतराने ही पुस्तकेही इ साहित्यवर प्रकाशित करण्याचा मानस आहे.

संपर्क

c/o डॉ. नितीन मोरे

१०१ न्यू हॅपी टेरेस, पंचवटी

अंबाडी रोड, वसई पश्चिम

पालघर ४०१२०२

# ९८२०९३७४९०

# दिव्य आनंदाचा झरा

पांडुरंग मोरे

*"काय करणार आहात तुम्ही इतक्या डायऱ्यांचे? मुले धरतील आणि टाकतील विकून कुणा रद्दीवाल्याला."*

*पत्नी मला नेहमी म्हणायची.*

*"अगं, ही आपली संपत्ती आहे. या लिखाणातून सुखी जीवनासाठी पाथेय जरुर मिळू शकेल. होईल, होईल जरुर कधीतरी या डायऱ्यातील लिखाणाचा उपयोग!" मी म्हणायचो.*

*आणि तस्सेच झाले! या डायऱ्यांचे पुनर्वाचन मी सुरु केले व विषयवार टिपणे काढली. या अथक प्रयत्नांतून आढळले की खरोखरी ही तर हिरे माणकांची खाणच जणु मला गवसली.*

*त्यातून साकार झालेले हे दिव्य आनंदाचे झरे!*

*-आणि म्हणूनच*

*केवळ समर्पणाच्या भूमिकेतून जिने जीवनभर माझी समर्थपणे साथ करुन माझ्या आयुष्यात आनंदाचा अक्षय्य झरा निर्माण केला व दैवी जीवन जगण्याची सातत्याने प्रेरणा दिली, त्या माझ्या प्रियतम पत्नीस- सौ. शशिकलेस विनम्र व कृतज्ञ भावनेने मनोभावे अर्पण. तिला जाऊन वर्ष उलटले तरी तिची अदृश्य साथ अद्याप मला उमेद देतेच आहे.*

पांडुरंग मोरे.

१० ऑगस्ट २००३.

*कसेही जीवन जगण्याचे अमर्याद स्वात्यंत्र देवाने तुम्हाला दिले आहे. मात्र असे जगताना तुम्ही सातत्याने दिव्य जीवनाचा आनंदाचा झरा शोधीत रहा. न पेक्षा जीवनाच्या अखेरीस एखादे प्रवाहपतीत जीवन वाट्याला आल्याचा पश्चाताप तुम्हांस होईल व तोवर तुमचे जीवन संपतही आले असेल व दिव्य जीवन जगण्याची तुमची संधी कायमची हुकलेली असेल. असे न व्हावे म्हणून हे पुस्तक.*

*ईश्वर मानवी जीवनात दीपस्तंभाचे किंवा होकायंत्राचे काम करतो. मनाचा कौल मिळतो, पण त्यासाठीच मन प्रगल्भ व सुसंस्कारित हवे व दिव्य आनंदाच्या डोहात डुंबायला हवे!*

# प्रास्ताविक

दिव्य आनंदाचा झरा  ह्याचे प्रास्ताविक करताना मन:स्थिती दोलायमान झाली. खरोखरच हे प्रास्ताविक लिहिण्यास मी पात्र आहे का? परंतु श्री. मोरे यांच्या विचार संकलनाचे यथायोग्य स्वागत करणे तरी मला शक्य आहे व केवळ याच भावनेतून मी हे चार शब्द लिहित आहे.

खऱ्या अर्थाने श्री. मोरेंचे हे विचार मंथन हे त्यांच्या स्वानुभवातून उत्पन्न झालेले आहे. त्यांचे सर्व जीवन हे दिव्य आनंदाच्या झऱ्यांच्या शोधात गेले आहे व हे मार्गक्रमण करतांना आलेली अनुभूती त्यांनी सुस्पष्ट शब्दांत मांडली आहे. प्रत्येकाला आपल्या पद्धतीने जीवन जगण्याचा हक्क आहे पण असे जीवन जगताना प्रत्येकाने दिव्य जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हे दिव्य जीवन म्हणजे काय व ते कसे जगावे ह्याचा उहापोह श्री. मोरे यांनी आपल्या संकलनात केला आहे. ह्या विचार मंथनातूच दिव्य आनंदाच्या अमृताचे आपण अनुग्रहण केले पाहिजे.

अशा दिव्य आनंदाची अनुभूती येण्यासाठी आत्मीभूत आत्मस्वरुपाची जाणीव करुन घ्यावी लागेल व एकदा ही जाणीव झाली की विश्वात पसरलेल्या परतत्त्वाची प्रचीती येऊ लागते. आपले मन विशाल होते व आपले व्यक्तिमत्त्व आमुलाग्र बदलून टाकते. आपल्या व्याक्तिमत्त्वाचा प्रत्येक अणुरेणु परब्रह्माच्या रुपाशी तादात्म्य पावतो व आपण अलौकिक सामर्थ्याचे धनी होऊ शकतो. आपल्या वृत्तीत व विचारसरणीत आमुलाग्र फरक पडतो.

आपले जीवनकार्य नियती ठरविते व आपण त्याकडे साक्षीभावाने पहावे. आपण केवळ वर्तमान कालातच रहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे व आपली रहाणी अत्यंत साधी असावी. ईश्वरावर पूर्ण विश्वास असावा. सुखी जीवनाची ही मार्गदर्शक तत्त्वे आहेत. ही तत्त्वे अंगिकारण्यासाठी आपणाला कठोर परिश्रमाची आवश्यकता आहे. केवळ दैवाला दोष न देता शुद्ध व उपयुक्त वातावरणात रहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मानसिक उन्नती साधावी. शरीर व मन शुद्ध ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे. शुद्ध व उपयुक्त आहार व आरोग्याच्या नियमांना अनुसरुन रहाणी, खेद व खंत यांना आवरणे यानेच आपणांस आंतरिक सामर्थ्य प्राप्त होऊ शकते.

आपले मन हे एक अमृत तडाग आहे तसेच ते घाणेरणे नरककूंड पण आहे. याची जाणीव ठेवून मनातील सर्व घाण काढून टाकून ते एक पवित्र मंदिर करावे. मनाची प्रवृत्ती अधोगतीची स्वभावत:च असते व ते अति चंचलही असते. त्यासाठी त्यावरील स्पंदने उपयुक्त कशी ठरतील ते कटाक्षाने पहावे. अंगी काही मूलभूत उत्तम गुण बाणविण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे. निर्भयता, त्याग, पावित्र्य, निस्पृहता, नि:स्वार्थी वृत्ती, परोपकार व त्याचप्रमाणे पूर्वजांचा जो काही चांगला घेण्यालायक भाग असेल तो आपल्या जीवनाचा भाग करुन टाकणे. व्यक्तीपेक्षा त्याने दिलेल्या विचारांवर, संस्कारांवर श्रद्धा ठेवावी व हे सद्विचार आपल्या आयुष्यात आणणे म्हणजेच श्रद्धेची जपणूक. हीच श्रद्धा मनुष्याला सामर्थ्य देते, जीवन घडविते, प्रेरणा देते. ज्या गोष्टी टाळता येण्याजोग्या नाहीत त्या अप्रिय व दु:खद जरी असल्या तरी त्या धीराने सहन करण्याची शक्ती प्राप्त करुन घेतली पाहिजे. एकमेकांना समजावून घेण्याची आवश्यकता आहे. माणसाच्या मनाची झेप क्रियाशील विचारात

झाली व त्यात भगवंताचे अधिष्ठान लाभले तर आपण आदर्श मनुष्यधर्म निर्माण करु शकतो. आपल्याला परमेश्वराने का जन्माला घातले आहे याचा आपल्या मनाशी अंतर्मुख होऊन शोध घ्यावा व जे आपले विहित कार्य आहे ते प्रामाणिकपणे, नि:स्वार्थीपणे तनमनधनपूर्वक व परमेश्वरार्पण बुद्धीने करणे ही गोष्ट ज्यांना साधली त्याला दैवी जीवन लाभले असे म्हणता येईल.

प्रेम करायला आपण आपल्यापासूनच सुरुवात करावी. सर्वांशी अत्यंत प्रेमाने, निष्कपटपणे वागावे. आपल्या कृतीमध्ये व वाचेमध्ये प्रेम प्रगट व्हावे म्हणजेच आपणाला सर्वत्र प्रेममय व आनंदाचे वातावरण निर्माण करता येईल व त्यात आपण पूर्णपणे समरस होऊ शकू. मनाला संतोष, इंद्रियांवर संयम, वागण्यात विवेक, वाणीत गोडवा व परमेश्वराचे नित्य नैमित्तिक स्मरणच आपल्या आत्म्याचे अनुसंधान धारण करण्यास मन समर्थ बनवते. साऱ्या जगाचा व्यवहार परमात्म्याच्या प्रेरणेनेच होत असतो. त्याच्या चैतन्यानेच जगामध्ये सर्व हालचाली होतात. सर्व प्राण्यांच्या हृदयात अंतर्यामी रुपाने रहाणारे हे शुद्ध चैतन्य सर्वांमध्ये ओतप्रोत भरलेले असूनही अलिप्त असते हेच त्याचे वैशिष्ट्य असते. आपले अलिप्तपणाचे स्वरुप न सोडता अनंत विश्वाची रचना त्याच्याकडून होत असते ही मोठी नवलाईची गोष्ट आहे. अंतर्यामी असलेला हा ईश्वर सुखदाता व शास्ता आहे. कालाचा नियंता आहे. ईश्वर म्हणजेच पावित्र्याची मूळ खूण आहे.

दैवी जीवन जगता यावे यासाठी आत्म्याशिवाय जीवनात दुसरे काहीही महत्त्वाचे नाही अशी ठाम समजूत असली पाहिजे. ईश्वराचे दर्शन झाल्याशिवाय आपल्या जीवनाला पूर्णत्त्व येणार नाही ही भावना दृढ असली पाहिजे.

आपल्या अंतरंगात जो देव आहे त्याची अनन्यभावे प्रार्थना केली की आपली दृष्टी अंतर्मुख होते. आपल्या अंगात दिव्यशक्ती निर्माण होते. चिंतामुक्त होऊन सर्वत्र आनंद दिसू लागतो. त्याकरिता अंतर्मुख होऊन दिव्य शक्तीचा स्पर्श अनुभवणे यासारखी भाग्याची गोष्ट दुसरी नाही. मात्र अंत:करणात देव आहेच हा नि:संदेह भाव मनी असू द्यावा. त्यासाठी दिव्य आनंदाचे अनेक झरे ह्या पुस्तकात आपल्यासाठी दिले आहेत. त्याचा सर्वंकष विचार आपण करावा व दिव्य जीवनाचा आनंद मिळविण्याचा प्रयत्न करावा.

सर्वेपि सुखिन: सन्तु

सर्वे सन्तु निरामय:

सर्वे भद्राणि पश्यन्तु

मा कश्चित दु:खमाप्नुयात।

पुरुषोत्तम श्री. कुलकर्णी

# मनोगत

वास्तविक दैवी जीवन यासारख्या विषयावर लिहिण्याची माझी पात्रता नाही. तरी पण पोटतिडिक का काही म्हणतात ना, त्यानुसार मला हे सांगितलेच पाहिजे. बुडती हे जन, न देखवे डोळां या भूमिकेतून मला लिहावयास प्रेरणा मिळाली. त्याप्रमाणे मला जे जीवन लाभले व मी कसा तरी या जीवनाच्या अखेरच्या अंकापर्यंत येऊन पोहोचलो त्याच्या अनुषंगाने, तसेच थोर लोकांच्या लिखाणातून, त्यांच्या ग्रंथातून मला जे भोवले त्या अनुभवसिद्ध गोष्टींवरुन मी हे पुस्तक लिहिण्यास प्रवृत्त झालो. वाचकांनी त्याच्यातल्या योग्य वाटतील त्याप्रमाणे वागण्याचा निश्चय करावा व त्या गोष्टींची रोजच्या दैनंदिन कार्यक्रमात त्याची अंमलबजावणी करावी व आपले जीवन सोन्याचे करुन घ्यावे. माझ्या जीवनाचे सोने झाले, मला मार्ग मिळाला, इतपत स्वत:ची शेवटी खात्री पटली की या लिखाणाचे चीज झाले असे मी समजेन.

स्वामी विवेकानंदांनी सारा भारत पायी फिरुन पाहिला. श्री ज्ञानेश्वर माऊलींनी पण सर्व क्षेत्री यात्रा केली. स्वामी रामदासांनीही भारतभर फिरुन सर्व परिस्थिती पाहिली. या प्रत्येकाच्या लक्षात आले की समाजाला आपण जागृत केले पाहिजे. स्वामी विवेकानंदांच्या काळात भारत पारतंत्र्यात होता. सर्व समाजाचे अवलोकन केल्यानंतर त्यांच्या ध्यानात आले की, काही मूठभर लोक चंगळवादी जीवन जगताहेत तर बहुतेक सर्व पाश्चात्य देशांचे भ्रष्ट अनुकरण करण्यात धन्यता मानताहेत. सर्वसामान्य जनतेत घोर अज्ञानाचे साम्राज्य पसरलेले होते व त्यांची

फसवणूक होत होती. त्यांना कन्याकुमारीच्या खडकावर ध्यानस्थ अवस्थेत, या समाजाची जागृती केलीच पाहिजे की जेणे करुन भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्त्व त्यांना आकलन होईल, याची प्रकर्षाने जाणीव झाली. त्याप्रमाणे त्यांनी शिकागो येथे सर्वधर्मपरिषदेत जाऊन जगाला भारताची मान ताठ कशी होईल ते पाहिले व मोलाचे कार्य केले. श्री. ज्ञानेश्वर महाराजांनी मूठभर वेदविद्यासंपन्न तथाकथित पुरोहितांना श्रीज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहून चकित केले व सर्व समाजाला गीतेतले तत्त्वज्ञान अवगत करुन दिले. शिवाजी महाराजांच्या काळात मुसलमानी सत्तेचे अत्याचार पाहून शिवाजी महाराजांनी हिंदुत्वशाही स्थापन केली व मराठा तितुका मेळवावा हे ब्रीदवाक्य समाजाच्या मनी रुजविले व त्यात समर्थ रामदासांनी फार मोठी मदत केली. दासबोधासारख्या ग्रंथातून जीवनात कोणत्या गोष्टी आवश्यक असतात ते सांगितले व समाजाची जागृती केली. पण आपल्या भारतीय समाजाचे वैशिष्ट्य हेच मला भासते की, या समाजाला वेळोवेळी जागृत करावे लागते व त्याची पुन:पुन्हा येणारी मरगळ घालवावी लागते. तसे पाहिले तर भारतीय संस्कृती अतिशय व्यापक आहे व जीवन समृद्ध व संपन्न करणारी अनेक तत्त्वे त्यात आहेत. पण श्री. ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितलेले आसुरी संपत्तीचे लोण आपल्या भारतीय संस्कृतीत स्वार्थापोटी वारंवार पसरते व संभवामि युगे युगे अशी परमेश्वरालाही घोषणा करावी लागते.

सांप्रतची भारतातील परिस्थिती पाहता वरीलप्रमाणे परिस्थिती याहून फारशी वेगळी आहे असे दिसत नाही. स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झाली व लोकशाही शासनपद्धती भारतात आहे हे वरकरणी चांगले वाटले तरी लोकशाही राज्यपद्धती

राबवणारे जे करंटे व स्वार्थी राजकारणी भारताला लाभले आहेत, त्यांच्या कार्यक्षमतेविषयी फार भूषणावह वाटावे असे दिसत नाही. गुन्हेगारही राजकारणी झाले आहेत. भारतात भ्रष्टाचार हा खोलवर पसरलेला रोग असून भारतातील अंतर्गत परिस्थितीच ऐनवेळी दगा देईल अशी स्थिती दिसते व तीच जास्त धोक्याची वाटते. पुष्कळ लोक परकीय संस्कृतीच्या चंगळवादी संस्कृतीचे पाईक बनले आहेत. माहिती व तंत्रज्ञान यांचा भरघोस प्रसार झाला खरा पण चंगळवादी व्यापारी लोकांनी आपल्या स्वार्थासाठी टी.व्ही. चा जाहिरातीद्वारे अतिशय दुरुपयोग चालविला आहे. स्वार्थ सर्वत्र बोकाळला असून दुसऱ्याच्या खिशातले द्रव्य आपल्याकडे कसे येईल हेच पहाणे उरले आहे. जर खरोखर पाकिस्तानशी युद्ध झालेच (देव करो ते न होवो) तर आपल्या भारतातील देशद्रोही लोकांकडूनच जास्तीत जास्त उपद्रव केंद्र सरकारला होईल अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत ‘मेरा भारत महान’ या घोषणा पोकळ ठरणार नाहीत तरच आश्चर्य! बेकारीचा राक्षस दिवसेंदिवस उग्रस्वरुप धारण करतो आहे. सर्वसामान्य जनता अजूनही दारिद्र्यात दिवस कंठते आहे. घोर अज्ञान पसरले आहे. म्हणून जीवनातला जो महत्त्वाचा घटक म्हणजे माणूस हाच केंद्रबिंदू मानून त्याचे जीवन दैवी कसे होईल, त्याची वाटचाल भारतीय संस्कृतीच्या उच्च तत्त्वाप्रमाणे कशी होईल ते पहाणे अत्यंत जरुरीचे वाटले म्हणून या पुस्तकाचा प्रपंच परमार्थासाठी केला आहे!

सर्वसाधारण माणूस हा जरी स्खलनशील असला तरी त्याला स्पष्ट मार्गदर्शनाच्या अभावी जीवनातल्या प्रसंगांना तोंड कसे द्यावे, निस्पृहपणे वागूनही आपण आपले व आपल्या कुटुंबाचे हित पाहू शकतो व त्याचवेळी भारतीय

संस्कृतीतील उच्च तत्त्वे योग्यप्रकारे पाळून आपले जीवन चांगले जगू शकतो यासाठी सुस्पष्ट असे मार्गदर्शन सर्वसामान्यांना हवे आहे. जवळच्या मार्गाने जाऊन खडकात सुखी शिखर गाठता येईल. एकदा व्यक्ती सुधारली की कुटुंब सुधारते, गाव सुधारते, प्रांत सुधारतो, देश सुधारतो, अशी ही वाढती परंपरा आहे.

तेव्हा,

उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत (कठोपनिषद १/३/१४)

(म्हणजे उठा, जागे व्हा, व ध्येय प्राप्त केल्याविना थांबू नका.)

या स्वामी विवेकानंदांच्या हाकेप्रमाणे आपणही जागृत होऊन सदासुखी व दैवी जीवनाकडे वाटचाल करुया.

आपण आपले मौल्यवान जीवन कसे जगावे याविषयी योग्य विशिष्ट दृष्टीकोन यावा लागतो. न पेक्षा प्रवाह पतित आयुष्य घालवावे लागून उत्तर आयुष्यातही दिव्य आनंदाच्या झऱ्याचे दर्शन होत नाही. दिव्य जीवन जगून शाश्वत आनंदाकडे, सौख्याकडे आपली वाटचाल व्हावी या हेतूने या पुस्तकाची रचना केली आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत थोरा मोठ्या संतांनी व दैवी पुरुषांनी सुखी जीवन जगता यावे, काळजीमुक्त आयुष्य वाट्याला यावे, यासाठी विविध ग्रंथांतून ठायी

ठायी मार्गदर्शन केलेले आहे. या ग्रंथांचे वाचन मात्र फारच थोडे लोक वेळेअभावी करु शकतात. मग आचरण तर राहिले बाजूला. अशाच ग्रंथांतून संकलित केलेले निवडक विचार या पुस्तकात तुम्हांस सापडतील व आनंदाचा झरा जीवनात निर्माण करुन दिव्य जीवनाकडे वाटचाल करण्याची क्षमता तुमच्या अंगी येईल. असा मला विश्वास वाटतो.

ह्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी ज्या ज्या सहृदांनी आत्मीयतेने मदत केली व त्यामुळे सुंदर स्वरुपात हे पुस्तक प्रकाशित झाले याबद्दल सर्व संबंधितांचा मी आभारी आहे.

पांडुरंग ना. मोरे.

# आनंदाचे घर

आनंदाच्या घरी, ईश्वराचा वास।

सुखाचा प्रकाश पडे तेथे ॥

आनंदाच्या घरा, ज्ञानाची कवाडे।

संसाराचे कोडे सुटते पै॥

आनंदाच्या घरा, सौख्य हो साकार।

अमृताची धार वर्षतसे॥

किंबहुना सोये, जीव आत्मयाची लाहे।

तेथ जे होए, तया नाम सुख॥

आनंदाचे घर तुम्हास हवे? तर मग आपल्या ठायी असणाऱ्या आत्मस्वरुपाची ओळख करुन घ्याच. त्याची एकदा जाणीव झाली की, साऱ्या विश्वात विस्तारलेल्या परतत्त्वाची आपोआप प्रचीती येते. तुम्ही त्याच्याशी एकरुपता अनुभवू शकता. तुमचे मन विशाल होते व ते तुमचे व्यक्तिमत्त्व आमूलाग्र बदलून टाकते. तुमच्या व्यक्तीमत्त्वाचा प्रत्येक अणूरेणू परब्रह्माच्या विश्वातील रुपाशी तादात्म्य पावतो व तुम्ही अलौकिक सामर्थ्याचे धनी होऊ शकता. असे झाल्यावर तुमची वृत्ती, तुमची प्रत्येक कृती पारदर्शक होते. तुम्ही निष्कलंक, शालीन व लीन बनता.

जीवनात सुखाचे मार्ग सांगितले आहेत ते असे –

१. नियती घटना घडविते, त्याकडे साक्षिभावाने पाहणे.

२. आपण केवळ वर्तमान काळातच रहाण्याचा प्रयत्न करावा.

३. साधी रहाणी ठेवावी.

ईश्वरावर पूर्ण विश्वास असावा.

आपले जीवन आपल्या संकल्पाने चालत नसून ते ईश्वराधीन आहे ही निर्विवाद गोष्ट आहे (व ती आपण खऱ्या सुखासाठी स्वीकारली पाहिजे) कारण तसे नसते तर जगात दु:ख कोणासच झाले नसते. ज्या घटना आपल्या जीवनात घडतील त्यात समाधान मानून राहणे ही ईश्वराधीन जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे. यासाठी रोज थोडे परीश्रम करुन संधी मिळेल तसे विधायक उद्योग करावेत. दैवाला दोष न देता शुद्ध व उपयुक्त वातावरणात राहण्याचा प्रयत्न करावा. मानसिक उन्नती साधावी. शरीर व मन कटाक्षाने अत्यंत पवित्र ठेवावे. म्हणजे सामर्थ्य आपोआप येते. शुद्ध व उपयुक्त आहार, आरोग्याच्या नियमांना अनुसरुन राहणी, खेद व खंतीचा

अभाव अशी जीवनातली भूमिका तयार करावी. आपले मन हे एक अमृत तडाग आहे तसेच ते अत्यंत घाणेरडे नरककुंड पण आहे. याची जाणीव ठेवून मनातील सर्व घाण काढून टाकून ते एक पवित्र मंदिर करावे. मनाची प्रवृत्ती अधोगतीची स्वभावत:च असते व ते अति चंचल असते. यासाठी त्यावरील स्पंदने उपयुक्त कशी ठरतील ते कटाक्षाने पहावे.

To do one's duty with perserverance and enthusiasm, to offer a helping hand and to do something good for others without harming any one is the highest degree of devotion and sacrifice. Each person should learn to live an honest life and concentrate on making his fellow beings happy instead of causing sorrow to mankind.

अवगुण सांडिता जाती। उत्तम गुण अभ्यासिता येति॥

असे समर्थ रामदास स्वामींनी दासबोधात सांगितले आहेच. म्हणून अंगी काही मूलभूत उत्तम गुण बाणवण्याचा कसोशीने प्रयत्न करणे हिताचे ठरते. जसे, निर्लोभी वृत्ती, दिलेला शब्द पाळणे, निरहंहारी वृत्ती, दुसऱ्यास कधी त्रास न देण्याची

वृत्ती, निर्भयता, त्याग, पावित्र्य, निस्पृहता, निस्वार्थी रहाणे, दुसऱ्यांची कदर करणे, पूर्वजांचा जो काही चांगला घेण्यालायक भाग असेल तो आपल्या जीवनाचा भाग करुन टाकणे. व्यक्तीपेक्षा त्याने दिलेल्या विचारांवर, संस्कारांवर श्रद्धा ठेवावी व हे सद्विचार आपल्या आयुष्यात आणणे म्हणजेच श्रद्धेची जपणूक. हीच श्रद्धा मनुष्याला सामर्थ्य देते, जीवन घडविते, प्रेरणा देते.

ज्या गोष्टी टाळता येण्याजोग्या नाहित त्या अप्रिय व दु:खद जरी असल्या तरी त्या धीराने सहन करण्याची शक्ती प्राप्त करुन घेतली पाहिजे. संसारात एकमेकांशी वाद घालण्यापेक्षा एकमेकांना समजावून घेण्याची आवश्यकता फार आहे. माणसाच्या मनाची झेप क्रियाशील विचारांत झाली व त्यांना भगवंताचे अधिष्ठान लाभले तर मानव कुल Common Wealth of Man निर्माण होऊ शकेल. कसाही विचार केला तरी वाटते की माणसाच्या भोवतालच्या वातावरणात अशा काही सृष्ट शक्ती असाव्यात, त्या आपल्याला दिसत नाहीत वा जाणवतही नाहीत. पण आपल्याकडून अचूक पावले टाकीत असतात, आपला सांभाळ करीत असतात.

आपली भारतीय संस्कृती उच्चरवाने आपल्याला सांगत असते –

१. सत्याचरण रुप नावेनेच तुम्ही तरुन जाल.

२. निरपराध लोकांची / प्राण्यांची हिंसा करणे, त्यांना जीवंत जाळणे / ठार मारणे हे प्रकार महाभयंकर आहेत, ते टाळायलाच हवेत.

३. सर्वांचे सदोदित हितचिंतनच करीत राहिले पाहिजे.

४. उत्तम संकल्पाने माझ्या हातून सत्कर्मेच घडावीत अशी इच्छा बाळगावी.

५. दातृत्त्वबुद्धी असणाऱ्यांचे ऐश्वर्य कमी होत नाही.

६. शुद्ध पवित्र आचरणाने परोपकारमय जीवन जगावे.

७. राष्ट्र व विश्व यांचे संवर्धन ब्रह्मचर्य तपाने करावे.

८. तपाचरणानेच, साधनेनेच ईश्वराच्या स्वरुपाचे आकलन होते.

९. पवित्र शास्त्रांचे अध्ययन करावे व पवित्र व्हावे.

१०. देवा तूच एक आमचा आहेस व आम्ही तुझेच आहोत, ही जीवन निष्ठा जोपासावी.

११. मी निराळा, भगवान निराळा व लोक निराळे अशी भेदबुद्धी मनात न ठेवता, मी व भगवान एकच आहे ही भावना जो सर्वभूतांत ठेवतो व सर्व भुते भगवंतात व आपल्यातही आहेत असे समजतो तो खरा भगवद्भक्त होय.

१२. सामर्थ्य हा शरीराचा धर्म नसून तो मनाचा धर्म आहे असा योगशास्त्राचा सिद्धांत आहे.

ही तत्त्वे लक्षांत घेऊन आपला जीवनक्रम ठेवावा व तसे वागण्याचा प्रयत्न करावा.

आपल्याला परमेश्वराने का जन्मास घातले आहे याचा आपल्या मनाशी

अंतर्मुख होऊन शोध घ्यावा व जे कार्य आपले जीवनकार्य आहे, असा अंत:करणापासून संदेश मिळेल ते कार्य प्रामाणिकपणे, नि:स्वार्थीपणे, तन-मन-धन पूर्वक व परमेश्वरार्पण बुद्धीने करणे ही गोष्ट ज्याला साधली त्याला दैवी जीवन लाभले असे म्हणता येईल. माणसाने आपण निमित्तमात्र आहोत अशी मनाची धारणा ठेवावी. म्हणजे जीवनाचा खरा हेतू माणसाच्या लक्षात येऊन उगवत्या दिवसाचे प्राप्त कर्तव्य निर्लेप राहून करता येते व जीवनमुक्त अवस्थेकडे वाटचाल अधिक सुकर होते.

# जीवनाचे रहस्य

या आपल्या जीवनाचे रहस्य काय आहे? जीवनाचे अवघे रहस्य आहे निर्भय, निर्भर होणे. तुम्ही या जगात एक क्षणभरही एकाकी नसून कुठली तरी अदृश्य व अगम्य शक्ती तुमच्या भोवती तुमच्या जीवनात नेहमी कार्यरत असते. या शक्तीची जाणीव सदैव मनात असू द्या. मग तुम्ही सुख दु:ख, यश अपयश यांसारख्या द्वंद्वांकडे तटस्थ भूमिकेतून पाहू शकाल. म्हणूनच निर्भय व्हा, निर्भर व्हा! आपले काय होईल, कसे होईल याची तुम्ही अजिबात चिंता करु नका. तुम्हाला कोणावरही अवलंबून राहण्याची गरज नाही. ज्यावेळी तुम्ही दुसऱ्याच्या सहाय्याची आशा व त्यावरील भरवसा पूर्णपणे सोडून देता, केवळ त्या क्षणी तुम्ही मुक्त होता व खरे जीवन जगू लागता.

नसत्याच्या पाठी धावत जाऊन ऊर फोडून घेऊ नये. प्रत्येकाने आपले आयुष्य आपणच जगायचे असते हे लक्षात ठेवा. स्वत:चे आयुष्य, सोसाव्या लागणाऱ्या दु:खाने कष्टी न होता, खुशीने जगायचे असते. देवाच्या कृपेमुळे ते मिळाले, याचाच आनंद मानावा. मी करतो ही भावना टाकून देवून, सर्व काही तो करतो व त्याची इच्छा असेल तोपर्यंत आपल्याकडून तो करवून घेत राहील अशी निष्ठा जोपासून संसारात आनंदाने वावरावे.

Do not think of Him as if He were far away from you. Think of Him as your's nearest. Then He will reveal Himself to you. The only two essentials are faith and self-surrender. God cannot be won by a system of rituals but only by love and sincerity. A man must keep his body, senses and spirit honest and pure, unspotted, unworn as young as Adam.

You cannot escape work because Prakriti drives you to do it. That being so, let all work be done as it should be done, without attachment.

"Without attachment" does not imply without conscience or zero or love of good work but only without the hope of reward. Not a single good will emerge from corrupt souls. Our motto is –

आत्मतो मोक्षार्थ जगत्हिताय च।

We have to choose in between -

बुभुक्षा – Desire for Enjoyment.

मुमुक्षा – Desire for Liberation.

Of course, we choose the later one.

नर ऐसी करणी करे नरका नारायण बन जाये।

March ahead with unceasing prayer of God to give you strength to fulfil His will. That is all.

गोकुळासारखे घर असले तर असू द्या. पण गोकुळाला शोभा आणणारा परमात्मा त्यात हवाच. गरीबी कितीही असली तरी ते घर सुखरुप दिसेल खास. जीवनाला उंची आणि व्यापकता आणून प्रत्येकाने हौसेने जीवन जगत राहिले पाहिजे. अहो, आपले आयुष्य आपण वर्षांनी मोजायचे नसते तर ते सत्कृत्यांनी मोजायचे असते, हे पक्के ध्यानात बाळगावे!

तसे पाहिले तर माणसाच्या मूलभूत गरजा असतात तरी किती?

१. उपजीविका - अन्न, आरोग्य, निवारा.

२. संरक्षण - काळजी वाहणे, काम, एकजूट, देखभाल.

३. प्रेम - स्वप्रतिष्ठा, प्रेम, वात्सल्य.

४. समज - अभ्यास, विश्लेषण.

५. सहभाग - जबाबदारी, हक्क, कर्तव्ये.

६. विश्रांत - खेळ, कुतुहल, विनोद.

७. सर्जनशीलता - प्रतिभा विलास, भावना, काल्पनिकता, काव्य.

८. स्व-अस्मिता - समाजाच्या चौकटीचे भान  आत्मभान, ऋण.

९. स्वातंत्र्य - स्वायत्तता, समता, निर्णय घेण्याची संधी व कुवत.

या मूलभूत गरजा प्रत्येकाने काळजीपूर्वक भागवाव्यात. या गोष्टी सुखी जीवन जगण्यासाठी जरुरीच्या असतात.

प्रेम करायला आपण आपल्या घरापासून सुरुवात करावी. सर्वांशी अत्यंत प्रेमाने, निष्कपट प्रेमाने वागावे. आपले बोलणे अगदी गोड असावे. आपल्या बोलण्यामध्ये, नव्हे आपल्या पहाण्यामध्येसुद्धा प्रेम असावे. प्रेम करायला गरीबी आड येत नाही किंवा श्रीमंती असेल तर फार द्यावे लागत नाही.

आपण आपल्या आयुष्याचे गणित चुकू देऊ नये. स्वत:ला देह समजून राहणे ही पहिली चूक- म्हणजे देह माझाच समजून त्याच्यावर प्रेम केले. या देहाचे विचार आपल्याला चिकटल्यावर त्यांचीच जोपासना करीत रहाणे ही दुसरी चूक. एकदा हे विकार चिकटल्यावर, त्यांची वाढ न थांबवता, ते नेतील तिकडे त्यांच्या मागे जाणे व त्यासाठी वेळोवेळी आपली बुद्धीही गहाण टाकणे ही तिसरी चूक. अशाप्रकारे आयुष्याचे गणित साफ चुकते.

याचमुळे जगामध्ये अत्यंत श्रीमंत, अत्यंत धाडसी, अत्यंत बुद्धिमान आणि अत्यंत चिकाटीची माणसे पुष्कळ आढळली तरी शुद्ध अंत:करणाची व निष्ठावंत अशी

माणसे मात्र क्वचितच सापडतात. जे लोक काम क्रोधादि विकारांना ताब्यात ठेवत नाहीत ते वेळप्रसंगी विकारांना केव्हा बळी पडतात याचा नेम राहत नाही. या करिता जाणून घेतले पाहिजे की आपल्या अनुभवास येणारे जे दृश्य विश्व आहे ते इंद्रियांना जड भासले तरी मूळ स्वरुपात: परमेश्वर रुपच आहे. किंबहुना, विश्वाला पाहणारा मी, हा देखील वस्तुत: परमात्माच आहे. परमात्मरुपच आहे. म्हणून देहबुद्धीचा निरास करुन आधी स्वत:मधील भगवंताचे रुप ओळखावे आणि त्यामागून विश्वामध्ये भरलेले त्याचे रुप अनुभवावे. मनाला संतोष, इंद्रियांना संयम, वागण्यात विवेक, वाणीत गोडवा व परमेश्वराचे स्मरण असावे की ज्यामुळे आत्म्याचे अनुसंधान धारण करण्यास मन समर्थ बनेल.

ईश्वरासंबंधी आपली समज व मन प्रगल्भ बनविले पाहिजे. जगत्‌जड आहे पण त्याचे मूळ परमात्म्यामध्येच आहे. हे आपण पाहिले. त्याच्या चैतन्यानेच जग हालचाल करते. त्या चैतन्याशिवाय विश्वातील पानही हलत नाही. सर्व प्राण्यांच्या हृदयात अंतर्यामी रुपाने राहणारे हे शुद्ध चैतन्य सर्वांमध्ये ओतप्रोत भरलेले असूनही अलिप्त असते हे त्याचे वैशिष्ट्य असते. आपले अलिप्तपणाचे स्वरुप न सोडता अनंत विश्वाची रचना त्याचेकडून होत असते ही मोठी नवलाची गोष्ट आहे.

अंतर्यामी असलेला हा ईश्वर सुखदाता व शास्ता आहे. काळाचा नियंता आहे. असा हा ईश्वर म्हणजे पावित्र्याची खूण आहे.

## प्राण आणि मृत्यू त्यांचे साहचर्य.

प्राण म्हणजे केवळ भौतिक व यान्त्रिक श्वसनक्रिया नव्हे! ती पिंडांतर्गत कायिक, वाचिक, मानसिक व बौद्धिक अशा सर्व जीवनव्यापारापासून ते समग्र ब्रह्मांडाच्या अनेकविध व्यापारांपर्यंत वस्तूमात्राचे आतून संचालन करणारी वैश्विकशक्ती आहे. म्हणून प्राण म्हणजे ब्रह्मशक्ती, जीवनातील प्राण निघून जाताच त्याचा सप्राण देह निष्प्राण होऊन जातो व कलेवर तेवढे उरते. तरीपण विश्वात्मक असे जे प्राणस्पंदन ते कधीच संपुष्टात येत नाही.

प्राण सर्व भूतांचा, इंद्रियांचा आत्मा आहे. हे प्राणमय आत्मत्त्व म्हणजे अमृतत्त्व. प्राणाचे सर्वंकष महत्त्व ज्याला आकळेल, तो कोणत्याही प्राण्याला कधीही दुखावणार नाही. अनादर करणार नाही. आपल्या अंतर्यामात नित्य स्पंदत राहणाऱ्या प्राणाचे अनुसंधान कधीही विचलित होऊ न देता तो जीवन जगत राहिल व तीच त्याची जीवननिष्ठा बनेल.

तो म्हणेल,

"असतो मा सद्गमय। तमसो मा ज्योतिर्गमय। मृत्योर्मा अमृतंगमय॥"

हा प्रवास म्हणजेच जणु जीवनयात्रा.

ज्याला प्राण म्हणजे काय हे कळले तो मृत्यूच्या पार निघून जातो. त्याची मुळे विश्वात्मक संवेदनशीलतेने रसरसू लागतात. मानवी जीवनाला असताकडून सताकडे, तमाकडून ज्योतीकडे, मृत्यूकडून अमृताकडे सदैव नेत रहातात. म्हणून सत्, ज्योति व अमृत अशा त्रिवेणी संगमात अवगाहन करणे व कृतकृत्य होणे हाच मानवी जीवनाचा परम पुरुषार्थ ठरतो आणि प्राणाचे स्पंदन हे आपल्या इच्छे-अनिच्छेवर अवलंबून नसून ते स्वयंभू व स्वयंसर्जनशील आहे याची प्रचिती येते. सृष्टी सर्जनाला कारणीभूत होणारे प्राणस्पंदन हेच आंतरिक प्राणरुपाने आपल्यामध्ये श्वसन करीत आहे. असा साक्षात्कार घडतो व त्यातूनच आंतरिक आत्मस्वरुप प्राण आणि विश्वात्मक ब्रह्मस्वरुप प्राण यांचे सामरस्य घडून येते. या सामरस्याचा प्रवाह म्हणजेच सत्-ज्योति-अमृतरुप त्रिवेणी संगमाचा प्रवाह व प्रवाहात होणारे अवगाहन म्हणजेच सच्चिनानंदमय जीवन.

जे जे या जगात आहे, ते सर्व ईशावास्य आहे आपणही ईशावास्यच आहोत. म्हणजे आपण, आपले मीपण व आत्मत्त्व हे सर्व ईशावास्यच आहे. ईशादत्त, ब्रह्मदत्त, प्रकृतीदत्त असेच मानवाच्या मानवतेचे रुप आहे. या वस्तूस्थितीचे अवधान राखून जीवन जगणे एवढेच आपल्या हाती आहे. जीवनाला कैवल्य प्रागधारा, विवेक-विषय-निम्रा, कल्याणकर स्वरुप प्राप्त होत रहाते व अशा चिदानंदमय जीवनाचे ज्यांना साक्षात दर्शन होते ते उद्गार काढतात,

ओम पूर्णमिद: पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्चते।

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्वमेमावशिष्यते॥

ओम शांति: शांति: शांति:॥

मृत्यू हाच विकासशील सृष्टीचा एकमात्र प्रजापति आहे. जन्म प्रक्रिया ही मृत्यूमुळेच उदयास आली आहे. मृत्यूला सोबत घेऊनच प्राणी जन्माला येतो. जीवन विकास हा मृत्यू व प्राण यांच्या अखंड साहचर्यामुळेच घडून येतो. म्हणून मृत्यू ही आपत्ती न मानता एक वरदान समजले पाहिजे. म्हणून मरणाची भीती आपण सोडली पाहिजे. 'The soul of progress is the progress of our soul', असे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी सांगितलेच आहे. मृत्यू आणि आत्मा यांचे साहचर्य इतके निकटचे आहे!

काही वेळा मरण यावे वाटते. ते येत नाही व मरणमय यातना सोसत जीवन जगावे लागते. अशा वेळी माणसाची सुटका मरणानेच होते व सुटला बिचारा असे जवळचे नातेवाईक उद्गारतात. हे मरण वरदानच नव्हे काय? सोफोप्लीसने म्हणूनच म्हटले आहे, मृत्यू हे दुर्भाग्य नव्हे, या पेक्षा मोठे दुर्भाग्य हे की, माणून मरण मागतो आहे पण मरण येत नाही!

मरणाकडे पाहण्याची दृष्टी अशी असवी - "I died as mineral and become a plant" (जलालुद्दिन रुमी)

मी मरणार तर खरेच पण रुपांतरित होऊन अधिक क्षमतेने मी पुन्ह: जन्मणार आहेच असा विश्वास मनात ठेवावा. मरण म्हणजे केवळ एक रुपांतरच असते.

# भोवरे १अ

*त्यावेळी माझे वय असेल १५-१६ वर्षांचे. मॅट्रिक होण्यासाठी १-२ वर्षांचा अवधी असेल. राष्ट्र सेवादलात मी जात असे. त्यातूनच ओळखीने मला एका सद्‌गृहस्थाकडून काही लिखाणाचे काम मिळाले. माझे अक्षर सुरेख म्हणून ते मला काही मोबदला पण देणार होते. मी ते काम इतक्या चांगल्याप्रकारे केले की ते एकदम खूष झाले व त्यांनी स्वेच्छेने माझी मॅट्रीकच्या वर्गाची मासिक फी मला देऊ केली. वर्षभर ते मला १० रु. मासिक याप्रमाणे देत. ते मला आपला मित्र म्हणून इतरांना ओळख करुन देत. हा त्यांचा मोठेपणा.*

*मी पण कसोशीने अभ्यास करुन परीक्षेत चांगले यश मिळविले.*

*त्यानंतर प्रश्न आला कॉलेजचा. आमची आर्थिक परिस्थिती यथातथाच होती. मी मोठ्या भावाकडे राहत होतो. त्याला मॅट्रिक नंतर नोकरीच करणे भाग पडले होते. परीक्षेनंतर दोन महिने सुटीचा काल होता. त्यात मला एका ऑफिसमध्ये Leave Vacancy मध्ये Clerk म्हणून नोकरी मिळाली. ती मग Clear Vacancy झाली. तेव्हा मग मी दादांना म्हटले, "मी आता या नोकरीतच राहतो. कॉलेज शिक्षण नकोच!"*

*ते मला ठामपणे म्हणाले, "अरे वेडा आहेस का तू? मला एक कॉलेज घेता आले नाही. तुलाही त्यापासून वंचित ठेवायचे? छे! तू नोकरीचा राजीनामा दे. परिस्थिती काय, आज उद्या पालटेल. पण तुला उच्च शिक्षण मिळालेच पाहिजे!"*

*आणि मी Commerce College join केले!*

*आता सांगा, दादांचे ऋण मी मानायला पाहिजे की नाही? त्यावेळीच मी करीत असलेली नोकरी चालू ठेव, म्हणून त्यांनी सांगितले असते तर?*

*हा एक माझ्या आयुष्यातील महत्त्वाचा Turning Point च ठरला!*

# भोवरे १ब

*मी कोयना डॅम डिव्हिजनला अकाऊंटंट असताना घडलेला असाच एक प्रसंग माझ्या जीवनातला एक मोठा Turning Point ठरला त्याची ही कहणी.*

*झाले काय, आमच्या समोरच असलेले Chief Accounts Office ने एक Circular काढले. ते माझ्या नजरेस पडताच मी त्यावर लाल पेन्सिलीने लिहिले, 'हे चुकीचे आहे.' माझ्या ऑफिसरांनी मला बोलावून विचारले. तेव्हा मी नियमांचे पुस्तक घेऊनच त्यांच्या खोलीत प्रवेश केला व साधारण २ तास सर्व अंगांनी चर्चा करुन CAO ने पाठविलेले ते सर्क्युलर चुकीचे कसे आहे हे मी त्यांना पटवून दिले. त्यांनी त्यावर आपण परत CAO लिहावे असे सांगितले.*

*CAO म्हणजे आमचे सासू ऑफिसच म्हणाना. त्यांना विरोध करायला कुणीच धजावत नसे. पण मी माझ्या वरिष्ठांच्या सहीने ते सर्क्युलर कसे चुकीचे आहे व बरोबर काय असायला हवे ते नियम क्रमांक वगैरे टाकून CAO कडे पाठवून दिले.*

*झाले! जणू बॉम्बच पडावा असे वातावरण बनले. CAO च्या एका ऑफिसरने मला बोलावून दटावले, आम्ही सांगितल्याप्रमाणे कार्यवाही करण्याऐवजी*

*हा नसता उपद्व्याप तुम्हाला कुणी सांगितला? तुम्हाला हे महागात पडेल!*

*मी म्हटले, हे सरकारी ऑफिस आहे व इथले सर्व कर्मचारी नियमाला बांधील आहेत. तुमचे सर्क्युलर कसे चुकीचे आहे ते नियमांच्या आहारे मी माझ्या वरिष्ठांच्या सहीने पाठविलेल्या पत्रात नमूद केलेलेच आहे. तेव्हा तुम्हाला फेरविचार करावाच लागेल.*

*आजपर्यंत कुणीही असे सासू ऑफिससाठी केले नसल्याने तेथील इतर सहकारी अकाऊंटंट मंडळीही कशाला हा उपद्व्याप केलास तू असे उलट मलाच म्हणू लागले. मी त्यांना सांगितले की नियम ही आपली ताकद आहे व नियमानुसार कार्यवाही होणे हे सरकारी ऑफिसात उचित ठरते. नियमांचे योग्य interpretation व्हायलाच हवे.*

*दुसरेच दिवशी CAO कडून मला बोलावणे आले. मी गेलो. ते I.A. & A.S. ऑफिसर होते. त्यांनी मला विचारले, "Why are you rotting in this Office? You are M.Com. If I send you elsewhere on good Deputation, are you ready to go?"*

*"Yes Sir, Even with a short notice, I am prepared to go on*

any deputation."

आठच दिवसात त्यांनी मला BARC, Trombay, Mumbai ला deputation वर पाठविले. तशी Order हातात पडली. त्यावेळी BARC ला Deputation साठी मोठा वशिला लागत असे. मला असे वरीलप्रमाणे भांडून विनावशिला deputation मिळाले व हा एक मोठाच Turning Point माझ्या आयुष्यात ठरला! भोवरा खरा, पण त्यातून सुटून मी प्रगतीकडेच वाटचाल केली. मी PWD Department ला कायमचा रामराम ठोकू शकलो.

जाता जाता एवढेच सांगतो की मी उपस्थित केलेला मुद्दाच अखेर योग्य ठरुन CAO कडून पत्र आले-

The Circular issued under ref. No. ________ Dated ________ may be treated as cancelled. आणि तो

माझा मोठाच विजय ठरला.

## दैवी जीवन

दैवी जीवन जगता यावे यासाठी -

१. आत्म्याशिवाय जीवनात दुसरे काही महत्त्वाचे नाही अशी ठाम समजूत असली पाहिजे.

२. ईश्वराचे-आत्म्याचे दर्शन झाल्याशिवाय आपल्या जीवनाला पूर्णता येणार नाही, ही भावना दृढ असावी.

३. दिनक्रमात ही जाणीव सातत्याने ठेवून त्याच्या अनुसंधानात राहणे, यामुळे तुमचे चित्त कोमल बनते.

भगवंताशी अशाप्रकारे सख्य ठेवले तर स्वानंदाने तृप्त होऊन देहामध्ये विदेहीपणाने राहता येते हा अनुभव घ्यावा व दैवी जीवनाची रोकडी प्रचीती घ्यावी. मात्र यासाठी खऱ्या तळमळीची आवश्यकता असते.

आपल्या अंतरंगात जो देव आहे त्याची अनन्यभावे प्रार्थना केली व आपली दृष्टी अंतर्मुख केली म्हणजे आपल्या अंगात दिव्य शक्ती निर्माण होते व चिंतामुक्त होऊन सर्वत्र आनंद दिसू लागतो. याकरिता अंतर्मुख होऊन दिव्यशक्तीचा स्पर्श अनुभवणे यासारखी भाग्याची दुसरी गोष्ट नाही. मात्र अंत:करणात देव आहेच हा नि:संदेह भाव मनी असु द्यावा.

दैवी जीवन हवे तर मनाची एकाग्रता साधावीच लागेल. स्वत:च्या मनाच्या सर्व शक्तींची एकाग्रता हेच आपल्याला ईश्वरदर्शनार्थ साहाय्य करणारे एकमेव साधन आहे. एकाग्र मन म्हणजे जणू एक प्रदीप आहे. त्याच्या मदतीने आपल्या आत्म्याचा अगदी कानाकोपरादेखील बघता येतो. आत्म्याचे स्वरूप नीट तंतोतंत बघता येते. हा दैवी अनुभव प्रत्येकाने घ्यावाच. प्रयत्नपूर्वक घ्यावा.

मनाच्या माध्यमातून बघितलेला आत्मा म्हणजेच ईश्वर होय. ईश्वर म्हणजे मनाने केलेली आत्म्याची धारणा, ज्याचे सर्वश्रेष्ठ नांव आहे ओम. म्हणून ध्यानधारणा ओम वर करतात आणि त्याच्या अद्भूत स्वरुपाचे व अपूर्व अर्थाचे चिंतन करतात. सदा सर्वकाळ ओमकाराचे अनुसंधान ठेवणे ही खरी उपासना बनते. अहो, ओम हा काही साधा शब्द नाही. तो स्वयं ईश्वररुप आहे!

आपण जोपर्यंत आपल्या मनावरचे डाग दूर करत नाही, तोपर्यंत

आपल्याला सत्याचे यथार्थ दर्शन घडणे शक्यच नसते. तुम्हाला तुमचे स्वत:चे हे तुमच्या आंत दोष दिसतात (यासाठी कठोर आत्मपरिक्षण हवे) ते सारे दूर करा. तुम्ही एकदाच निर्दोष होऊन गेलात की तुम्हाला तुमची नैतिक पातळी जितकी उंचावेल तितकी उत्कृष्ट अनुभूती तुम्हाला येऊ शकेल आणि तितकीच तुमची इच्छा शक्ती बलवान झालेली असेल. अहो, जीवनमुक्त पुरुषाचा देह आपोआपच शुभ वा उचित कर्म करीत असतो. तो संपूर्ण पवित्र होऊन गेल्यामुळे तो केवळ चांगले कार्यच करु शकतो. ज्या जुन्या संस्कराच्या वेगामुळे त्याचे शरीर जगत असते ते सारे संस्कार शुभच असतात. अशुभ संस्कार दग्ध होऊन नाहीसे झालेले असतात.

आपण आपल्या वासनांचे गाठोडे बोचके बांधून ते दाराबाहेर पटकूनच टाकावयास हवे. ज्याला ह्या ज्योतिर्मय दैवी जीवनाची इच्छा आहे त्याने या ज्योतिर्मय राज्याच्या प्रवेशद्वारातून आंत येण्याआधी दुकानदारी वृत्तीधर्माचे गाठोडे बांधून ते बाहेरच फेकून दिले पाहिजे. तरच त्याला खऱ्या अर्थाने आत प्रवेश मिळू शकेल. याकरिता आवश्यक गोष्ट म्हणजे वासनांना तिलांजली देणे. मग परमेश्वरवरील प्रेम हे संपूर्णपणे शुद्ध व नि:स्वार्थ असेल व यात स्वत:साठी इहलोकीच्या वा परलोकीच्या आकांक्षा मिसळलेल्या राहणार नाहीत.

दैवी जीवनासाठी कोणताही गुरु आपल्याला साहाय्य करण्यापेक्षा काही करु शकत नाही हे आपण नीट लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून गुरुचे केवळ अनुकरण करु नका. विचार स्वाधीनपणेच करा व स्वत:चे जीवन दैवी बनवा. ईश्वरासंबंधी फक्त

एकच कल्पना असू द्या की, तो आपला नित्य सहाय्यक आहे व पाठीशी आहे. स्वाधीनता असली की, कोणतेही बंधन येत नाही. मात्र खात्री असू द्या की आपण भगवंताला काहीच देऊ शकत नाही. उलट तोच आपल्याला सारे काही देत असतो. तो समस्त गुरुंचा गुरु आहे. तो आपल्या आत्म्याचा आत्मा आहे. तोच आपले खरे स्वरुप आहे. तो आपल्या आत्म्याचा अंतरात्मा आहे. मग आपण त्याच्यावर सर्वोच्च प्रेम करावे यात खरोखर आश्चर्य कसले? त्याच्याखेरीज आपण कुणावर व कशावर बरे प्रेम करु शकू?

आपला उद्धार आपणच करुन घेण्याच्या उद्योगाला लागावे व आपले जीवन दु:खमुक्त करुन आनंदमय जीवन जगावे. शांती तेव्हाच मिळेल जर जीवनातील सर्व कर्तव्ये आपण उत्तमप्रकारे पार पाडली असतील. त्यासाठी अविश्रांत श्रम करण्याची तयारी ठेवावी. शांती आणि आनंद आपल्या मनाची बैठक व जीवनाकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन यावर अवलंबून आहेत. माणूस जर दैवी गुणसंपत्तीचा आश्रय घेऊन जगेल तरच तो खऱ्या सुखशांतीचा लाभ घेऊ शकेल. पूर्ण सात्विक वृत्ती, निर्भयता, कर्मयोगाविषयी तत्परता, इंद्रिय निग्रह, सरळपणा, सत्य, अहिंसा, अक्रोध, दया, निर्लोभता, नम्रता यासारख्या गुणांना गीतेतील सोळाव्या अध्यायात दैवी संपत्ती म्हटले आहे. आनंदमय दैवी जीवनासाठी या गुणांची जीवनात नितांत जरुरी आहे.

जीवनाचा आनंद अनुभवण्यासाठी चोख आरोग्य सांभाळणे अत्यंत

महत्त्वाचे ठरते. यासाठी पचेल तेवढाच आहार, झेपतील तेवढेच श्रम, जरुर तेवढीच विश्रांती आणि जीवन यथायोग्यपणे जगल्यामुळे मनाला सहज वाटणारा प्रसन्नपणा हे आरोग्यमय जीवनाचे चार प्रमुख आधारस्तंभ आहेत. अशोच, विकार, स्वार्थ, कुविचार, कुसंस्कार यांचा मळ जेव्हा धुतला जाईल तेव्हाच आत्मशक्ती, आतला आत्मानंद खऱ्या रुपाने प्रकट होईल. त्यासाठीच तर लाभले हे जीवन. अहो, जीवनाचा हेतूच मुळी हा आहे!

अंत:करणातील वासना, विकार, अज्ञान जेव्हा समूळ नष्ट होतात तेव्हाच आतील ईश्वराचे दर्शन मनुष्याला सहजच घडते. तो जणु अनंत आनंदाला कायमचा जाऊन मिळतो. शुद्ध झालेल्या अंत:करणात आपणांस आपल्या खऱ्या स्वरुपाचे दैवी दर्शन घडते व परम शांती प्राप्त होते. यापेक्षा उच्चस्थिती नाही.

शांतीपरते नाही सुख। येर अवघेचि दु:ख।

म्हणूनी शांती धरा। उतराल पैल तीरा॥

## जीवनातील प्रकाश - प्रसन्नता

ज्या मनावर विषयांचा बिलकूल परिणाम झालेला नाही, असे कुंवार मन (Virgin Mind) भगवंत स्वीकारतो. ज्याचे स्वस्थ चित्त मन विषयापासून दूर राहू शकत असेल त्याचे मन भगवंत स्वीकारतो. या करता स्वस्थ मनाचा (Virgin Mind) विषयापासूनचा संपर्क तोडला पाहिजे. या करिता चांगलेच विचार मनात असले पाहिजेत. चांगलेच संकल्प बुद्धीने केले पाहिजेत. असे केले की प्रसन्नता लाभते. आतून कारंजे उडू लागते, ती प्रसन्नता. सात्विक हर्ष उभा राहिला पाहिजे. याप्रमाणे जीवनात प्रकाश आणला पाहिजे. देवाने जे जीवन दिले आहे ते प्रेमाने जगले पाहिजे. जीवन जगून भगवंताला हसरा चेहरा दाखविता आला पाहिजे. भगवंतावर आत्मीयता जडल्यावर जीवनात थकवा जाणवत नाही. या करिता माझा विकास व विश्वास वाढू दे एवढेच देवाजवळ मागायचे. आपले जीवन चैतन्यमय कसे राहिल याची सातत्याने दक्षता घ्यावी. थकवा वा व्यथा जीवनातून हद्दपार कराव्यात.

आपल्या जीवनात यासाठी मन स्वस्थ हवेच तसेच ते विषयांपासून, विकारांपासून अलिप्त हवे. माझी कर्मे प्रभू सांभाळील. अशा श्रद्धेने जेव्हा माणूस कर्म करु लागेल तेव्हा तो भगवंताला आवडू लागेल. प्रभूवरील श्रद्धेने केलेल्या कर्मालाच निष्काम कर्मयोग म्हणायचे. जे मिळाले ते माझे नाही तर प्रभूने ते पाठवलेले आहे अशी जाणीव ठेवावी. हे सर्व देवाचेच आहे असे समजण्याची मनाला सवय लावावी.

प्रिय मिळाले तर फार हरखून जाऊ नये. अप्रिय मिळाले तर उदासीन बनू नये. सुखदु:खे समेकृत्त्वा लाभा लाभौ जयाजयौ॥ मनात चांगलेच विचार असावेत. बुद्धीत चांगलेच संकल्प असावेत. चित्ताची एकाग्रता सातत्याने वाढविण्याचा प्रयत्न चालू ठेवावा.

जीवनात जगण्यासारखे काहीतरी आहे असे वाटले पाहिजे. एवढेच नव्हे तर मरणही सुंदर वाटले पाहिजे. यासाठी विधायक दृष्टी तयार करावी. नेहमी हसता खेळता रहायला शिकावे. सर्व सृष्टी सुंदर दिसावी. जीवाला शिव व्हायचे आहे हे पक्के ध्यानी ठेवावे व तशी वृत्ती ठेवावी.

यथायोग्य तथा कुरु। एवढेच भगवंताला विनवायचे आहे. माझा विकास व विश्वास दृढतर होत जाओ एवढेच मागणे मागायचे. अहो, आपल्या जीवनातून भीती घालविल्याशिवाय जीवन आनंदी होणे शक्य नाही. यासाठी भगवंतावर १००% विश्वास हवा. त्याचप्रमाणे जीवनात प्रकाश आणला पाहिजे. जीवनाचे ध्येय निश्चित झाले पाहिजे.

स्वार्थ, विकार, दु:ख, दीनता, हीनता, लाचारी हा समस्त बुद्धीतला कचरा. तो कचरा काढून टाकून बुद्धी सुंदर बनवा की, लालसा निघून जाईल. बुद्धीला सुंदरता

प्राप्त होईल. त्यावेळी माणूस भगवंताचा आवडता होतो.

कुटुंबात परस्परांना उबेची जरुरी असते. त्यासाठी भावजीवन संपन्न केले पाहिजे. रस निर्माण केला पाहिजे. एकमेकांविषयी मानसिक ओढ असली पाहिजे. माणसाजवळ विचारांची परिपक्वता असलीच पाहिजे. आपला श्वासोश्वासही पवित्र हवा!

जगांत राहून स्वत:चा स्वतंत्र ताल राखावा. वाटेल त्याच्या तालावर नाचू नये. यासाठी जीवनात काही निश्चित संकल्प असलेच पाहिजेत. थकवा व व्यथा जीवनात अप्रसन्नता आणतात. म्हणून प्रयत्नपूर्वक जीवन चैतन्यमय केले पाहिजे.

जीवनात मनाच्या मशागतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्या मनाला ओळखणे, सांभाळणे आणि मनाची शक्ती वाढवणे ही दक्षता आहे. स्वाध्याय, सत्संग यांच्या मागे काही निश्चित विचारधारेची शक्ती असली पाहिजे. आपण आपल्या कार्यासाठी दक्षता व फलासाठी उदासीन राहावे. लक्षात असू द्या की आपल्या शरिरात भोगचक्र की जे देवप्रधान आहे व कर्मचक्र की जे पुरुषार्थप्रधान आहे अशी दोन चक्रे आहेत. आपण अभिलाषा व कामना ठेवूनच कर्म करतो. ही दोन्ही बाजूला काढली तरच आपण संकल्प करायचे भगवंतावर सोपवू शकू. म्हणून प्रथम कर्म

भगवंताला अर्पण करायचे व फलाची अपेक्षाच करायची नाही.

आध्यात्मिकदृष्ट्या परिपक्व होण्यासाठी मन व बुद्धी पद्धतशीर शिक्षण देऊन पुष्ट केलेली असली पाहिजे. चित्त एकाग्र करुन मन व बुद्धीला तरबेज करता येते. त्यालाच आध्यात्म म्हणायचे. निरपेक्ष प्रेम, दुर्दम्य श्रद्धा व अद्वैती अलौकिक आत्मीयता या तिन्ही गोष्टी आपल्यामध्ये आल्या पाहिजेत. आपली मती स्थिर हवी. जीवनात काही जगण्यासारखे आहे असे आपल्यापैकी प्रत्येकाला वाटले पाहिजे. एवढेच नव्हे तर मरणही सुंदर वाटले पाहिजे. यासाठी विधायकदृष्टी कमवायला हवीच.

# निष्काम कर्म

कृष्ण सांगतो,

संसार नाही सोडणेचा, संग सोडणेचा।

कर्म नाही सोडणेचे, कामना सोडणेची॥

माझी कर्मे प्रभु सांभाळील अशा श्रद्धेने जेव्हा माणूस कर्म करु लागेल तेव्हाच तो भगवंताला आवडू लागेल. प्रभूवरील श्रद्धेने केलेल्या कर्मालाच निष्काम कर्मयोग म्हणतात.

कर्म जे करावयाचे ते सकाम असता कामा नये. कर्म निष्काम असले पाहिजे. प्रपंच सोडून परमार्थ नाही करावयाचा तर प्रपंच असा करायचा की, प्रपंचच परमार्थ झाला पाहिजे. मुलीचे कार्यक्षेत्र सासरी असते. पण तिचा ओढा माहेरी असतो. मानवी जीवनाचे सूत्र म्हणजे प्रवृत्ती हे सासर व निवृत्ती हे माहेर झाले पाहिजे. भगवंताकडे नेणारे विचार, आचार यांचा पुरस्कार केला पाहिजे. भगवंतापासून दूर नेणारे विचार, आचार यांची उपेक्षा केली पाहिजे. भगवंताला विसरू नका. असे उच्च, प्रौढ, अभिजात, उदात्त व रसमय आनंदी जीवन जगता आले तर आणखी काय हवे? उंची + व्यापकता

ही जीवनात आणावी. वृत्तीचे समाधान असणे ही भगवंताच्या कृपेची खूण समजावी. हौसेने शेवटपर्यंत जीवन जगता यायला हवे. हेच दैवी जीवन.

हाती नाही येणे, हाती नाही जाणे।

हसत जगावे, हसत मरावे, हेच आपले गाणे॥

मी देहरुपी नसून अविनाशी सच्चिदानंद स्वरुपी आहे असे दृढ आत्मज्ञान झाले म्हणजे कसले मरणाचे भय?

थोडक्यांत, आपल्याला पूर्णावस्थेतील पुरुष म्हणून जीवन जगायचे आहे. यासाठी क्षमाशीलता, सरळपणा, मानीपणा नसणे, स्थिर वृत्ती, देह-इंद्रिये-मन यांचा निग्रह, मृदू बोलणे, वरच्या कोटीचा आध्यात्मिक अनुभव, मानसिक विकास पूर्ण झालेला, अजातशत्रु यासारख्या गुणांची जोपासना करता आली पाहिजे. सन्मान, सत्कार, कीर्ती, प्रसिद्धी यासारख्या गोष्टींपासून चार हात दूरच राहता यायला हवे.

वयाचे दडपण आपल्यावर नसावे. आरोग्यपूर्ण व क्रियाशील जीवन उत्तर आयुष्यात अत्यंत महत्त्वाचे ठरते. जीवनाबद्दल कुतुहल व जगण्याचा उत्साह जसाच्या

तसा कायम टिकवायला हवा. प्रौढत्वी निज शैशवास जपावे. वय झाले हे दडपण झुगारता आले पाहिजे. आपले काम मोठ्या निष्ठेने पार पाडत राहिले पाहिजे! म्हातारा कुणास म्हणावे? स्वभाव कायमचाच ठरुन जाणे ही म्हातारपणाची सुरुवात होय! वर्तनात बदल करण्याची, आपण निर्माण केलेले जुने संकेत मोडून नवे संकेत स्वीकारण्याची क्षमता संपली की म्हणावे माणूस म्हातारा झाला!

यासाठी दैवी जीवन जगावे कसे याचा ध्यास प्रत्येकाने घेतला पाहिजे. आपल्या स्वभावावर, वाणीवर, चारित्र्यावर आपले स्वामित्त्व हवेच. साहस, प्रेम, शालिनता या गोष्टी अभ्यासाने आत्मसात कराव्यात. आपल्यापेक्षा श्रेष्ठ असलेल्यांची मनापासून प्रशंसा करता आली पाहिजे. आपले स्वास्थ्य चांगले रहावे, संतोषीवृत्ती रहावी, जिवलग मित्र असावेत यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मितव्ययता, उद्योगशीलता व तत्परता यांची कास धरुन, अहंकार, क्रूरता, कृतघ्नता यांची घृणा वाटली पाहिजे.

या विश्वात जीवसृष्टी निर्माण होणे ही खूपच दुर्मिळ घटना आहे. विश्वात घडणाऱ्या एवढ्या दुर्मिळ घटनेने त्या जीव सृष्टीची सर्वोत्तम निर्मिती म्हणजे आपण बुद्धिमान सजीव मानव होत. म्हणून या जीवसृष्टीचे नाशापासून रक्षण करणे, तसेच या विश्वात अन्यत्र कुठेही न घडलेल्या या जीवसृष्टीची निर्मितीची वंशवेल चालू ठेवणे, क्षणिक रागाच्या भरात ती नष्ट न होऊ देता ती मानवी समाजाच्या कल्याणाच्या

सूत्रात गुंफणे ही आपणा सर्वांची विशेष जबाबदारी आहे, कर्तव्य आहे!

'सर्वे सन्तु सुखिन:' हा संदेश म्हणूनच फार उपयोगी ठरावा. शहर तेच असते. माणसे तीच असतात. वाईट असते ती वेळ. अहो, नियतीची ती खेळी असते. म्हटलेच आहे,

ईश्वर जाहलिया पाठमोरा, नसती विघ्नें येतीं घरा।
विशेष बाढे क्रोध काम, तरी देव क्षोभला जाणिजे॥
सर्वाभूती जन्निवास। यास्तव न कीजे कवणाचा द्वेष।
वर्मस्पर्शाचे शब्द सदोष। सहसा कोणा न बोलावे॥

इंद्रियांच्या विषयांच्या आकर्षणातून मन वर उचललेलं असण्यात एक वेगळाच आनंद असतो. म्हणून संसारी माणसाला जे हवेहवेसे वाटते त्याकडे स्थितप्रज्ञ माणूस ढुंकूनही पाहत नाही. तो आत्मिक आनंदात रमलेला असतो.

आपल्याला सारे काही कळले ही समजूत जीवनात व्यर्थ ठरते. कारण आपल्या बुद्धीचे सामर्थ्य फार तोकडे आहे. म्हणून भगवंताठायी शरणभाव, समर्पण

वृत्ती जरुरीची ठरते.

आपण जर भगवंताचे आवडते झालो तर आपल्या देहपाताचा क्षण सुखाचा व्हावा याची सारी चिंता भगवंत वाहतात. मृत्यूसमयीची व्याकुळता भक्ताच्या चित्तात उत्पन्न होऊ नये यासाठी भगवंत त्या भक्तीची आत्मज्ञान विषयक जाणीव जागी ठेवतात व कोणतेही आयास पडू न देता आपल्याकडे भक्ताला नेतात. त्या भक्तांच्या मृत्यूच्या क्षणी भगवंताने मुद्दाम यावे व त्यांना घेऊन जावे असे घडत नाही. कारण ते भक्त आपल्या शरीराचा त्याग करण्याआधीच भगवंताशी एकरुप होऊन गेलेले असतात. भगवंत किती दयाळू आहे पहा!

# भोवरे २

कॉलेज शिक्षण घेता घेता मी त्यावेळचे ' कर्तव्य' सायंदैनिक व नंतर 'साधना' साप्ताहिकात Part Time नोकरी केली. काम म्हणजे पडेल ते. अगदी Police News घेण्यापासून ते पत्रांवर पत्ते लिहिण्याचे व गठ्ठे बांधण्याचे, पत्र व्यवहार पाहण्याचे इ.इ. तेथल्या वरिष्ठांनी मला अगदी प्रेमाची वागणूक दिली. तेथे मला दरमहा ५५ रु. मिळत. मात्र घरी मी दादांना ३५ रु. मिळतात असेच सांगितले व राहिलेले २० रु. मनी ऑर्डरने वडिलांना गावी पाठवून देत असे. ते अशा बेताने की दादांनी अगोदर पाठवलेले अपुरे पैसे २० तारखेच्या सुमारास संपून जात, त्याचवेळी मी पाठविलेले हे २० रुपये त्यांच्या हाती पडत व त्यांना त्या पैशाचा मोठा आधार होई. ते पैसे काहीच मिळवत नसत व उत्पन्न काहीच नसल्याने ते नेहमी म्हणत, 'जळो जिणे लाजिरवाणे.' त्यांच्या म्हातारपणाच्या काळात त्यांना आधार देणे जरुरीचे होते व मी जर घरी सांगितले असते तर ओढगस्तीच्या संसारातून जी रक्कम ते वडिलांना पाठवीत त्यात कपात होण्याची भीती होती. मी म्हणूनच हा मार्ग अवलंबिला व वडिलांचा मोठाच दुवा मिळविला. कॉलेज शिक्षण पूर्ण होईतो ही व्यवस्था चालू राहिली. पुढे नोकरी लागल्यावर मीच वडिलांना जास्त पैसे पाठविण्याची जबाबदारी स्वेच्छेने स्वीकारली.

## अखंड साधना - अखंड प्रवास

विहित स्वकर्माचे आचरण हीच त्या सर्वात्मक परमेश्वराची सेवा आहे. त्या कर्माच्या आचरणातच आपलं खरं समाधान शोधावं. तोच आपल्या मनाचा एकमात्र विसावा व्हावा. जे काही कर्म घडले आणि जसे घडेल ते अखेर परब्रह्मात म्हणजे विश्वचालक शक्तीला अर्पण करावं. प्रत्येक कर्म करताना 'ओम तत् सत्' असे म्हटले की ते कर्म आपोआप प्रब्रह्माला उद्देशून केले जाते.

दैवी जीवन म्हणजे एक अखंड साधना आहे. या साधनेची सुरुवात इंद्रियांना वळण लावण्यापासून होते. ज्ञान प्राप्त झालेला साधक इंद्रियांना विषयांपासून मागे फिरवतो आणि आपले मन इंद्रियांच्या मागे जाऊ न देता ते आत्मस्वरुपाच्या चिंतनाकडे वळवितो.

आपल्या आयुष्यात सुख जसे प्राप्त होते तसे काही दु:खही वाट्याला येत रहाते. पण अशा प्रसंगी अविचल राहून आलेल्या प्रसंगाला तोंड देऊन त्याचा स्वीकार करणेच योग्य ठरते. वाईट भाग वाट्याला आला तरी त्याचा अव्हेर कसा करता येईल बरे?

तो ईश्वर आपल्या अंत:करणात वास करीत आहे. त्याच्या ठायी सारा अहंकार विसर्जित करावा. आपली वाणी, आपले चित्त, आपले अवघे शरीर म्हणजे त्याच्या द्वारे होणारे कर्म हे सारे काही भगवंताच्या चरणी वाहून टाकायचे, त्याला शरण जायचे. हे शरण कसे जायचे? तर गंगेचे पाणी सर्व समर्पित वृत्तीने महासागरांत प्रवेश करते त्याप्रमाणे.

आपल्या प्रत्येकाच्या जीवनात पायाभूत तत्त्व म्हणजे गीताज्ञान. म्हणून गीतेत काय ज्ञान सांगितले ते आपण थोडक्यांत पहाणे उचित ठरेल.

१. ज्ञान, योग, कर्म व भक्ती या साधन मार्गाचे स्पष्टीकरण.

२. परमेश्वराचे शाश्वत आत्मस्वरुप जाणून घेणे, हेच मानवी जीवनाचे एकमेव साध्य आहे.

३. जोवर शरीर आहे तोवर या जगांत कर्म सुटत नाही.

४. ईश्वरसमर्पित वृत्तीची जोपासना जाणीवपूर्वक हवी.

५. सारी कर्मे परमेश्वराला अर्पण करावीत आणि त्यांच्या बऱ्यावाईट फलांपासून मन पूर्णपणे अलिप्त ठेवावे.

६. कोणतीही अपेक्षा ठेवली नाही की मनाला जी प्रसन्नता लाभते ती साक्षात भगवंताच्या ठायी असते.

७. भगवंत सांगतात - मी तुला आतापर्यंत नाना प्रकारांनी ज्ञानाचा उपदेश केला आहे. ते ज्ञान आत्मसात करुन त्याच्या बळावर सारे अज्ञान टाकून दे. एकदा का उन्नत पातळीवर पोचले की त्याला होणारी सहज प्रेरणा ही एक विशिद्ध असे रुप धारण करते व आध्यात्मज्ञाची बैठक त्याला प्राप्त होते.

भोवतालची बदलणारी परिस्थिती, सार्वजनिक जीवनातली अस्थिरता, व्यक्तींच्या जीवनातील बदलती मूल्यें, ढासळणारी नैतिकता या सर्वांमुळे 'किम् कर्तव्यम्' अशी दिग्मूढ अवस्था सांप्रत प्राप्त झाली आहे व सामान्य माणूस त्यात सापडला आहे. त्याच्या प्रवाहप्रतीत जीवनापासून परावृत्त करुन त्याला योग्य मार्गदर्शन हवे आहे. त्याला आधार हवा आहे. आपल्या वाट्याला आलेले काम नेटकेपणाने, स्थिर मनाने व अनासक्त वृत्तीने पार पडण्याचे सामर्थ्य, मानसिक बळ

व मन:शांती त्याला हवी आहे. त्यासाठी त्याने स्वत:च्या जीवनाचे थोडे तरी निरीक्षण करावे व या संसारसागरातील आपले वेगळे स्थान व भूमिका ओळखावी. आपल्याच कोषांत न रहाता समाजाला सन्मुख होऊन इतर बांधवांचे सुखदु:खही आपले मानावे. ही भावना उदयास यावी.

हे करा व आनंदात रहा -

एकांतात स्वस्थ बसावे. रामाला आठवावे.

त्याच्या पायावर मस्तक ठेवून म्हणावे, रामा, माझे मन शुद्ध कर. देहबुद्धी येऊ देऊ नकोस. तुझे चरण , तुझे हास्य मला सदैव पाहू दे. तू माझ्या मस्तकावर वरद हस्त ठेव.

रामाला प्रेमाने ओळखून राम परानंद आहे हे जाणून, त्याच्याशी अनन्य होऊन रहावे. मी कुणीच नाही, सर्व काही राम आहे व मी रामाचा आहे या गोड भावनेत आनंदात असावे.

जीवन सुंदर आहे. फार सुंदर आहे. पण ते सोपे मात्र नाही. जीवन एका फटक्यांत आपल्याला जमीनदोस्त करते. आपण उठतो आणि जीवन आणखी एक फटका मारते. जीवन जेव्हा फटका मारुन खाली पाडते, तेव्हा एकच करायचे, आपल्या वाट्याला भोग येईल तो स्वीकारायचा आणि पुढे चालू लागायचे. तसा प्रत्येक माणूस एकाकीच असतो.

आपण भगवंताची प्राप्ती करुन घेणे म्हणजे दिव्य जीवनाकडे वाटचाल करणे. यासाठी आवश्यक गोष्टी अशा -

१. शुद्ध आचरण - प्रामाणिकपणा, धार्मिक आचार, नीतीचे वर्तन.

२. शुद्ध अंत:करण - अभिमान नसणे, द्वेष मत्सर नसणे, सर्व सुखी असावेत ही भगवंताची प्रार्थना करणे.

३. भगवंताचे नामस्मरण - भगवंताचा केव्हाही विसर न व्हावा. भगवंतावर निस्सीम प्रेम असावे. या प्रेमाची साधने म्हणजे आवडीने भगवंताचे नामस्मरण, सत्संग, कथाकीर्तन, सद्‌गुरुची कृपा ही होत.

सर्वात्मक परमेश्वराची पूजा कशी करावी ते पहा -

आपले काम चोखपणे करावे. आपण जो व्यवसाय पत्करला तो इमानी एतबाराने करणे ही पांडुरंगाची खरी पूजा आहे. सतत उद्योगात रहावे. आपल्या मिळकतीतील थोडा वाटा समाजासाठी जरुर ठेवावा.

दैवी जीवनासाठी परमार्थ साधणे आवश्यक आहे. हा परमार्थ तरी काय ते पाहू या -

१. सज्जनसंगती व हरीगुणश्रवण.

२. वासनाक्षय व सद्भावना जोपासणे.

३. सत्समागम व निष्कामबुद्धीने कर्म करणे.

४. वैराग्य अंगी बाणविणे.

५. गुरुभेट व गुरुकृपा संपादणे.

६. आत्मसिद्धी व मनाची अंतर्मुखता.

७. आत्म्याचे दर्शन होणे.

८. ब्रह्मैकता व स्वानंदाची प्राप्ती होणे.

९. खरी भक्ती साधावी. भक्तीत जीव अर्पण करायचा व नि:सीम भावाने देवाला भजायचे. भक्तीत भाव मौलिक आहे.

ज्ञानेश्वर महाराज सांगतात -

तरी झडझडोनि वहिला निघ। इये भक्तीचिये वाटे लाग।
जेणे पावसी अव्यंग। निजधाम माझे॥

१०. आत्म्याची प्रसन्नता म्हणजेच आत्मसाक्षात्कार. यासाठी भोगविलासातून चित्त पूर्णत: बाहेर पडावयास हवे. आत्मसाक्षात्कारी पुरुषाची क्रिया

सहज पालटते. त्याच्या मनाचे गुण पूर्ण बदलतात. तो सुखदु:खातीत होतो. तो सदैव आत्मानंदात असतो. त्याचे मन, त्याची वृत्ती स्थिर बनते. शांत होते.

११. मनुष्ययोनी ही कर्मभूमी एकमेव. बाकीच्या सर्व भोगभूमी आहेत. म्हणून मनुष्याला कर्म करण्याचे स्वातंत्र्य आहे. केवळ याच जीवनात दिव्य जीवन जगता येईल.

१२. आपले स्वरुप स्वत: ओळखावे, जाणवावे. स्वत:ला अंतर्मुखतेने न्याहाळावे व ही आध्यात्म विद्या अंगी मुरवावी.

शांत माणूस बनणे, दिव्य जीवनासाठी जरुरीचे. शांत माणूस आपल्या मनातील विकारांवर अधिराज्य गाजविणारा स्वामी असतो. संयमाने इंद्रियांचा सदुपयोग करायचा व त्यासाठी शुद्ध, पवित्र विचारच अंगी बाणवावे. यासाठीच आध्यात्मसाधना पक्की हवी. त्यातूनच आपण अधिकाधिक स्वाभाविकपणे शांत होत जातो. ही स्वाभाविकता डोळसपणे जोपासली की त्याचे रुपांतर खऱ्या विश्वधर्मात होऊ लागते. मी आणि माझ्या परिसराचा स्वाभाविक भाग व्यापक करीत करीत मी विशाल अर्थाने शांती जगाला देऊ शकतो. ही शांती कोणताही प्रसंग आला तरी प्रतिकार सामर्थ्य आपणामध्ये आणते. धैर्याने कृती करुन माणूस शांत रहातो.

# जीवनाची सफलता

लक्षात घ्या की, सर्व जन्म व सर्व मृत्यू म्हणजे निद्रा व जागृत होणे होय. निद्रा व मृत्यू मध्ये फरक हा की निद्रेनंतर तुम्ही उठता तेव्हा त्याच शरीरात आहात हे आठवते. मृत्यूनंतर तुम्ही जागे होता ते दुसऱ्याच्या शरीरात. तुमचा मृत्यू कधीच होत नाही. तुम्ही एकदाच जन्मता व तुमचा एकदाच मृत्यू होतो. मधल्या अवस्थेत चेतना उत्क्रांत होत जाते. खरा जन्म परिक्षित चेतना स्वीकारतो व खरा मृत्यू सर्व बंधनांपासून विमोचन करतो. मुक्त होतो. शरीराचा त्याग केल्यावर आत्मा ज्योतिर्जगताच्या शरीरात ज्योतिर्जगताचे The World of Astral अनुभवतो. हे जगत् स्थूल व सूक्ष्म कोषांचा दुवा असते. नवीन शरीर लाभेपर्यंत ज्योतिर्जगत असते.

अंतरात्म्याचे ध्यान कसे करावे? प्रथम आपले कर्म यथासांग करावे. देव अंतर्यामी विवेकाने ओळखावा. आपण ज्या देव-प्रतिमेची पूजा करतो तो कसा आहे हे आधी ओळखावे. मग वंदन करावे. अंतरात्माच प्रतिकरुपाने आपली पूजा स्वीकारत असतो. जो विष्णु सत्वगुणाने सर्वांचे पालन करतो, तोच आपल्या अंतरंगात जाणीव रुपाने आहे. तोच श्रवण करतो, तोच दर्शन करतो. जिव्हाळा म्हणून सर्वांभूती तोच असतो. तो त्रैलोक्याला चालना देतो. देहपुरीत त्याची सत्ता आहे. म्हणून स्वत:च्या देहामध्ये त्याला पहायला शिकावे. नंतर जगतात पहायला शिकावे. नंतर तो दोन्हीकडे एकच आहे हे ओळखावे. मग तोच एक सत्य, निश्चल, निर्मळ, विमल आहे

व बाकी सारे चंचल हे जाणावे. नंतर विचार करुन हे सर्व पहाणाराही तोच व आपण त्यावेगळे उरतच नाही याचा अनुभव घ्यावा व धन्य व्हावे. हा अनुभव हाच दैवी अनुभव.

बाकी सारे तेच असून नशीब तेवढे वेगळे असेल तर केवढा फरक पडतो पहा. एका बिंदुतून दोन रस्ते दोन दिशांना फुटावे तशी माणसांची आयुष्येच बदलून जातात आणि यालाच म्हणायचे एकेकाचे नशीब.

विवेक आणि वैराग्य हे दोन्ही दैवी जीवनाचे पायाभूत स्तंभ -

विवेकी पुरुषाने मौज म्हणून देखील इंद्रियांचे लाड करु नयेत. इंद्रिये प्रथम जिंकली पाहिजेत. कामाला इंद्रियातून हाकलून दिले पाहिजे. मग मनाची धाव थांबेल आणि बुद्धी कामातून मुक्त होईल. मग पुढचा मार्ग आत्मसुखाचाच राहिल.

ईश्वरप्राप्तीची साखळी अशी आहे -

प्रथम सद्गुरुंच्या व ईश्वराच्या गुणावरील प्रेम, त्यातून ईश्वराच्या प्राप्तीची

उत्कंठा व ध्यास - त्यासाठी दीर्घकाल विवेक विचारांचे ईश्वर गुणाधिष्ठित प्रेमाने चिंतनरुप साधन - या अशा मार्गानेच ईश्वरप्राप्तीसाठी चढती वाटचाल होते. वाढते आत्मसुख हाच मनाला दीर्घकाल स्थिर वृत्ती देणारा मुख्य उपाय आहे. या सगळ्या अभ्यासाची परिणिती आत्मसुखात व्हावी.

असे केले म्हणजे सर्वांभूती ब्रह्मभाव ही वृत्ती जोपासता येते.

जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत।

उंच नीच भाव सांडावे। एक मीचि ऐसे मानावे। वस्तुजात॥

## प्रगतीचा मार्ग

मन-देह-वाचा यांच्याकडून जे कर्म घडेल ते मी करतो असे मानू नये. करणे वा न करणे हे फक्त ईश्वरच जाणतो. अशी नम्र वृत्ती ठेवावी. माळी नेईल तिकडे पाणी जाते. तसे, ईश्वर घडवील ती कर्मे होऊ देत. आपण चित्तात ईश्वराचे अखंड स्मरण असू द्यावे व आनंदात रहावे. साधन सोपानाच्या या पायऱ्या आहेत.

मानवी जीवनाचे सार्थक कशात आहे?

मानवी जीवनाचे सार्थक लोकांना दया दाखविण्यात नाही तर ते लोकांमधल्या परमेश्वरावर प्रेम करण्यात आहे. त्यांच्या सेवेत सार्थक आहे. त्यांच्यातल्या ईश्वराचा शोध घेणे, हे खरे कार्य आहे. म्हणून विश्वाच्या कल्याणाच्या उद्योगात स्वत:ला गुरफटून घेतले पाहिजे.

मनुष्याला त्याच्या दिव्यत्त्वाची जाणीव करुन देणे आणि हा दैवी गुण त्याच्या प्रत्यक्ष जीवनातून कसा प्रकट होईल हे त्याला समजावून सांगणे जरुरीचे आहे. जगाच्या कल्याणासाठी चिरंतन प्रेम व दया याचे पाझर ज्यांच्या हृदयात आहेत असे शेकडो बुद्ध आज आम्हांला हवे आहेत. आपल्याला मानवता जागृत करावयाचे कार्य करावयाचे आहे. तेजस्वी पौरुषत्व निर्माण करायचे आहे.

सुखी जीवनाइतकेच गुणवत्तेचे चांगले जीवन असणेही म्हत्त्वाचे. जो मनुष्य सर्वांचे कल्याण इच्छितो, परधनाची इच्छा धरत नाही, शांत चित्त, विचारी, दक्ष व सावधान असतो, सन्मार्गाने अर्थार्जन व उचित गृहस्थाश्रम याविषयी ज्याला जाण आहे, नेहमी दानशील, शांतिपरायण असून जो इहलोक व परलोक या दोन्हींवर लक्ष ठेवून वागतो, त्याचे आयुष्य हितकर समजावे.

आपले आयुर्मान हे वेळोवेळी दक्षता, संयम व सातत्याने आरोग्यविषयक नियम यथायोग्य आचरणात आणले तर शंभर वर्षे आरोग्य सहजच लाभते. तशी मानसिक तयारी मात्र हवी. आहार, व्यायाम, आल्हाददायक उपभोग या गोष्टींविषयी नियमितता, उदार वृत्ती, स्थिर व न्याय बुद्धीने वागणारा, सत्यानेच चालणारा, क्षमाशील व सर्व परिवार आप्तांशी उत्तम संबंध व व्यवहार ठेवणारा असा मनुष्य नेहमी आरोग्य संपन्न राहतो. असा माणूस शंभरी सहज गाठून आरोग्य संपन्न जीवन उपभोगतो.

स्वास्थ्यासाठी हे करा -

दंतधावन, जिव्हा निर्लेपन, मुखप्रक्षालन, स्नेहन, स्नान, स्वच्छ वस्त्रांचा

वापर, वेळच्यावेळी केस कापणे, दाढी, नखे यांची काळजी घेणे, पादप्रक्षालन, शरीराची मलमूत्रादि द्वारे स्वच्छता या सर्व गोष्टी स्वास्थ्यासाठी महत्त्वाच्या. वाईट सवयी कटाक्षाने टाळाव्यात. हितकर आहार घ्यावा. मलमूत्र विसर्जनाच्या स्वाभाविक प्रेरणा दाबू नयेत.

# भोवरे ३ अ

*अधूनमधून आईवडिल दादांकडे येत. एकदा ते आले असता वडिल खूप आजारी झाले. त्यावेळी मी BARC त होतो व CHSS योजना होती. त्यात Parents included होते. म्हणून त्यांना BARC authorised J.J.Hospital मध्ये दाखल करु शकलो. ते खूपच आजारी झाले म्हणून त्यादिवशी त्यांना oxygen वर ठेवले होते. नाकात नळया होत्या. डॉक्टरांनी मला सांगितले, आजची रात्र कठीण दिसते. तुम्ही तुमच्या जवळच्या नातेवाईकांना बोलावून घ्या. कसे कोणास ठाऊक, हे वडिलांच्या कानावर गेले असणार. कारण डॉक्टर गेल्यावर त्यांनी मला जवळ बोलावून कसेबसे म्हटले, 'अरे, तू त्यांचे काही ऐकू नकोस. मी काही हॉस्पिटलमध्ये मरणारा नाही. मी देवाकडून महिन्याची मुदत मागून घेतली आहे. तू कुणाला बोलावण्याच्या भानगडीत पडू नकोस!'*

*मी चकित झालो. मात्र मी त्यांचे ऐकले. त्या रात्री मी त्यांच्याजवळच राहिलो. आश्चर्य म्हणजे त्या रात्रीतूनच त्यांना बरे वाटले. २-३ दिवसांतच ते घरी आले.*

*आठदहा दिवस गेले व एक दिवस ते म्हणाले,*

*'आम्ही दोघे आता गावी जातो. साधारण महिनाभरात माझे तुम्हांस पत्र येईल. त्यावेळी मात्र ते तार समजून तुम्ही सर्वांनी मिळेल ती गाडी पकडून गावी यायचे. त्यात उशीर करु नका.'*

*त्यांची प्रकृती सुधारली होती. म्हणून आम्ही त्यांचे बोलणे विशेष मनावर घेतले नाही.*

*मात्र काय आश्चर्य! महिन्याभरातच त्यांचे पत्र आले,*

*'पत्र पहाताच निघून या.'*

*म्हणून आम्ही दोघे भाऊ लगेच गावी आलो. बघतो तर काय? वडिलांची प्रकृत्ती एकदम ठिकठाक वरुन तरी दिसली. ते हिंडते फिरते पण दिसले. माझी बहिणपण पुण्याहून आली होती. ती वडिलांना म्हणाली, "हे हो काय नाना? किती घाबरवून सोडले तुम्ही आम्हाला? आणि एवढे तातडीने बोलावले?"*

*'अगं बाई, तशीच तातडीची वेळ आली आहे. मी मागितलेली वेळ भरत आली आहे. तुला मी जास्त दिवस नाही ताटकळत ठेवणार! तशीच घाई आहे म्हणून तर तुम्हास बोलावले.'*

*आम्हाला काही कळेनाच!*

*पण खरेच! दुसरे दिवशी बघितले तर वडिलांनी अंथरुण धरलेले! त्या दिवशी एकादशी होती. त्यांचा उपवास होता. दुपारी ४ वाजेच्या सुमारास त्यांनी मला सांगितले, "मला जरा तक्क्याला टेकवून बसव." त्याप्रमाणे मी केले. नंतर ते म्हणाले, "जा, अमुक अमुक मंडळींना मी बोलाविले असे सांग. मला त्यांचा निरोप घ्यायचा आहे!"*

*आम्ही चकारावून गेलो. तरी त्यांच्या सांगण्यावरुन त्यांनी ज्या ज्या मंडळींना बोलावण्यास सांगितले, त्यांना त्यांना बोलाविले. एक एक जण येत होता व वडिल त्यांचा निरोप घेत होते.*

*'बरंय मंडळी, मी तुमचा निरोप घेतोय! काही चुकले माकले असेल तर माफ करा!'*

*हा निरोप समारंभ सतत दोन तास सुरु होता. त्या दोन तासांत वडिल बसून होते व खणखणीत आवाजात एकेकाचा निरोप घेत होते. निरोप घेणारे सुद्धा भयचकित झालेले दिसले.*

*एकदशीचा दिवस संपला. रविवार होता तो. दुसरे दिवशी सोमप्रदोष होता. पहाटे ४ वाजता वडिलांनी मला हाक मारुन बोलावले व 'चहा कर, तूच कर व मला पाज' म्हणाले. माझ्या हातचा चहा त्यांना हवा होता. मी त्याप्रमाणे चहा करुन त्यांना पाजला. 'आता बास! मला आता काही नको.' असे म्हणाले व त्यानंतर त्यांनी संपूर्ण मौन स्वीकारले. खायला काहीसुद्धा मागितले नाही. लवकर जेवणे उरकून घ्या असे खुणेनेच सुचविले.*

*त्यानंतर ते स्वस्थचित्त पडूनच राहिले. आम्ही सारे उश्या पायथ्याशी बसून होतो. ते डोळे मिटूनच ध्यानस्थ भासत होते. सकाळी ११-११.३० ला जेवणे आटोपली. त्यांनी, त्यांना काही नको म्हणून हाताने खुणावले.*

*दुपारी ३ वाजण्याची वेळ. त्यांच्याकडून काहीच प्रतिसाद मिळणे बंद झाले. आईच्या ते लक्षात येताच तीने मला खुणावले. मी लगेच शिवलीलामृत पोथीतला ११वा अध्याय (रुद्राध्याय) काढला व मोठ्याने वाचू लागलो. वडिलांचे अंग गरम व्हायला लागले. इतके गरम की चटके बसताहेत असे वाटले. नंतर आईने मला रामरक्षा म्हणण्यास सांगितली. मी तीपण मोठ्याने म्हटली. भिमरुपी महारुद्रा म्हटले. एव्हाना त्यांच्या अवती भवती ५०-६० आप्तांची गर्दी जमली होती. सर्वजण रामाचा घोष 'श्रीराम जयराम जय जय राम' करीत होते व एक सोहळाच जणू साजरा होतो आहे असे भासत होते. आईने मग गंगा काढून नानांना पाजली. इतरांनीही एक*

एक चमचा पाणी पाजले. सर्वांचे घोट घोट पाणी त्यांनी पिऊन टाकले. जराही बाहेर पडले नाही. तेवढ्यात नानांचे एक जीवलग मित्र बाहेरगावाहून तातडीने बोलावल्यासारखे आले. ते येताच व त्यांचा आवाज ऐकताच नानांनी डोळे उघडले. दोघांनी एकमेकांचे हात हातात घेतले व खूणेनेच 'येतो मी' नानांनी सांगितले. आणि त्याक्षणी घरघर सुरु झाली.

आमचा नामघोष सुरुच होता. तप्त झालेले नानांचे अंग हळूहळू थंड होत गेले व प्रदोषकाळी ते कधी गेले ते कळलेच नाही. नाही आचके, नाही जीवाची उलाघाल. नाही ओढग्रस्त स्थिती. शांत शांत, सर्व शांतपणे संपले. मी उद्गारलो, झाले! शेवटी नानांनी सांगितले तस्सेच झाले!

या मरणाला तुम्ही मरणाचा सोहळा म्हणण्याशिवाय दुसरे काय म्हणणार? तशाही स्थितीत त्यांनी मरणाची भीती व असुरक्षितता घालविली असली पाहिजे.

'कां झाकलिये घटीचा दिवा। नेणिजे काय जाहला केव्हा।' या रीतीने त्यांनी देह ठेवला!

# <u>शरीराची स्वयंप्रज्ञा</u>

बाह्य परिस्थितीशी जमवून घेऊन शरीर व्यापाराचा तोल राखण्याचे स्वयंभू शहाणपण आपल्या शरीर यंत्रणेत असते. अंतर्गत सुसंगती व सातत्य ही जीवनाच्या अस्तित्त्वाची खूण समजावी. मानवी शरीरात रोग मुक्ततेकडे नेणारी निसर्गशक्ती कार्यरत असते. मात्र परिस्थिती जेव्हा निसर्गनियमांच्या मर्यादेपलिकडे गेलेली असते तेव्हा जीवित रक्षणाचे उपाय म्हणून जे काही करावे लागते ते आवश्यकच ठरते.

तसेच आरोग्य मनाचे. मनातले विचार कशातऱ्हेने योग्य की अयोग्य यांचे विश्लेषण करत विवेकनिष्ठ मनाकडे, विचारांकडे जाणे म्हणजे निरोगी, अविवेकी मनाकडे जाणे. मनावर आलेला ताण नाहिसा होण्यास फक्त योग्य विचारांची जरुरी असते.

**आरोग्यसंपन्न व्यक्ती** - नेहमी हितकर आहार व चांगले वर्तन असणारी, विचारपूर्वक कृती करणारी, विषयोपभोगांवर नियंत्रण ठेवणारी, उदार वृत्तीची, न्यायप्रिय, सत्यप्रिय, क्षमाशील वृत्तीची, आपल्या परिवारात सेवाभावाने वागणारी व्यक्ती ही खरी आरोग्यसंपन्न म्हणता येईल.

**सर्व शक्तींचा आविष्कार -** नेहमी खरे बोलणारा, राग न येणारा, मद्यपान व हिंसा न करणारा, काम पिपासू नसलेला, अतिश्रम न करणारा, शांतवृत्तीचा, मधुरवाणी असलेला, शुद्ध आचरण असलेला, वडील माणसे, गुरु, आचार्य यांची सेवा करणारा, कधी कोणाचा घातपात न करणारा, नेहमी लोकांविषयी करुणा असणारा, सर्वदा जागरण व निद्राही प्रमाणात व योग्य वेळी घेणारा, देशकाल प्रमाण जाणणारा, युक्तिज्ञ, अभिमानरहित, सदाचारी, अंतर्बाह्य एकाकार वृत्तीचा, ज्याची सर्व इंद्रिये ईश्वर परायण झाली आहेत, असा पुरुष मूर्तीमंत रसायन समजा. तोच सर्व शक्तींचा आविष्कार समजावा.

**जीवन आणि मृत्यू -** जीवन ही एक अज्ञान यात्रा आहे. केव्हाही, काहीही घडू शकते. परमेश्वराने प्रत्येकाला कार्याकरीता एक विशिष्ट कालखंड व कार्यक्षेत्र दिलेले असते. ते संपले की, परमेश्वर मृत्यूरुपाने येऊन सांगतो, तुझे अस्तित्व आता संपले आहे. मृत्यू म्हणजे जीवन नाटकातील भूमिकेची समाप्ती. मृत्यू हे केवळ नवजीवनाचे द्वार आहे. त्याच्याकडे निर्भयतेनेच पाहावे. अस्वस्थ होणे अजिबात नको.

**गौणी भक्ती -** माणसाचे मन हे पारंपारिक व पिढ्यानपिढ्या चालत आलेला

साधा व सोपा मार्ग चोखाळत असते. त्याला एखाद्या गोष्टीच्या मुळाशी जाऊन ती तपासून पाहण्याची सवय नसते. म्हणून त्याला पूजा-अर्चा, तीर्थ-प्रसाद, स्तोत्रपठण, उपास-तापास, व्रते-वैकल्ये, हा ढोबळ परिचित मार्ग आपल्या वासनापूर्तीसाठी सोपा व बरा वाटतो. म्हणून सकाम भक्ती ही खऱ्या अर्थाने भक्ती म्हणताच येणार नाही. यासाठी ती गौणी भक्ती म्हटली जाते.

**खरी भक्ती** - निष्काम भक्ती करावी. खऱ्या देवाला खरोखर खरेपणाने ओळखून त्याची खरीखुरी भक्ती करावी. ईश्वराशी परम प्रेमाचा संबंध जोडावा. त्याच्याशी एकरुप होण्याचा प्रत्यय घ्यावा. हीच निष्काम भक्ती. ही प्रक्रिया प्रयत्नांनी साध्य होऊ शकते. त्यालाच उपासना, साधना म्हणायचे. यासाठी जरुरी असते - आपला भाव व आपली अंत:करणातील शुद्धता. ही साधना करतांना ईश्वराकडून कसलीच अपेक्षा ठेवायची नसते हे महत्त्वाचे. हाच निष्काम भक्तीयोग समजावा.

देवाने दिलेली देणगी हेच स्वत:चे कर्तृत्त्व वाटणे हा अहंकार. हा अहंकार जीवनाची माती करतो. माणसाचे अस्तित्त्व ईश्वराच्या सत्पासून निर्माण झाले आहे. त्याच्या बुद्धीतील शक्ती, ज्ञान मिळविण्याची तळमळ ही ईश्वराच्या चित्पासून निर्माण झाली आहे. तसेच जीवाचे स्वत:वर असणारे प्रेम हे ईश्वराच्या सुखदु:ख विरहित अशा आनंदापासून निर्माण झाले आहे. म्हणूनच ईश्वराला सच्चिदानंद म्हटले आहे व माणसाने पण त्याच स्वरुपांत रहावे ही त्याची इच्छा आहे. पण होते काय?

याच गोष्टीचे नेमके विस्मरण झाल्यामुळे जीवाला हे आपले स्वयंभू गुणधर्म आहेत असे वाटून अहंकार निर्माण होतो.

लक्षात घ्या की, आपल्या पूर्वजन्मीच्या अपुऱ्या वासना, आपण आतापर्यंत जमा केलेले पाप-पुण्य, आपली सध्याची परिस्थिती व आपल्याला लागलेली परमेश्वराची ओढ या सर्व गोष्टींवर आपली जीवनातील आध्यात्मिक प्रगती अवलंबून असते.

## देव व मी

देहाच्या पातळीवर - देव स्वामी, मी दास

जीवाच्या बाजूने - देव परिपूर्ण, मी अंश

आत्म्याच्या दृष्टीने - देव व मी एकच आहोत.

# प्रेम - एक अमोल वस्तू

भगवंतावर प्रेम असे करावे -

ईश्वराची सेवा व चिंतन केल्याने मनोवृत्ती कोमल झाली पाहिजे. ती एक यांत्रिक क्रिया होता कामा नये. अशी निष्ठा उत्पन्न झाली की, तिच्या पुढची पायरी भक्तीची. याच भक्तीचा परिपक्व भाव ईश्वरचरणी अर्पण करता येतो व हाच भाव घनीभूत झाल्याने महाभाव बनतो. सगळयात शेवटी या सगळयाचे रुपांतर ईश्वरावरील प्रेमात होते. प्रेम म्हणजे अशी रुची की तिच्यापुढे जगाचा विसर तर पडतोच पण स्वत:ला सुद्धा विसरायला होते. अशा प्रेमामुळे भगवंत आपल्याशी बांधला जातो. सेवा, चिंतन, निष्ठा, भक्ती, भाव, प्रेम अशा या परमेश्वराला प्राप्त करुन घेण्याच्या वाढत्या भाजणीच्या पायऱ्या आहेत. आपण एक एक पायरी चढत जावे, वरपर्यंत. कणाकणांत भगवंताचा अनुभव घ्यावा.

माझ्या एकांतातल्या मंदिरात तू

फुलाचा सुगंध बनून यावे

दीपाची ज्योत बनून यावे

आणि

मधुर घंटारव बनून यावे

माझ्या मौनाच्या घुमटाखाली

मी तुला केवळ

प्रेममूर्ती स्वरुपात पाहू इच्छितो

परमात्म्यापर्यंत पोहोचण्याची रीत आहे.

प्रेम करायचे, खूप प्रेम करायचे

आणि जीवन संपवायचे

व्यक्ती संपते, विभूती बनून जाते.

साधना सात्विक भावाने करावी. त्याचे फक्त नांव घ्यायचे पण त्याचे बोल प्रेमात ओतप्रोत भरलेले हवेत. हे फार कठीण काम आहे. पण हे सुद्धा भगवंताशी चित्त लागण्यासाठीच. माणूस सरळ झाल्याखेरीज सरळरुपी भगवंताला ओळखू शकणार नाही. ईश्वरनिष्ठांचे श्रेष्ठीसुद्धा सांत व सातिव भाव दर्शवितात. सच्ची नम्रता, नि:स्पृहता, सत्त्वशीलता, मनाची तरलता या सर्व गोष्टी कालच्या काल संपल्या. ज्याने कालची समाधी साधली त्याची आता आज नव्याने सुरुवात होत आहे व म्हणूनच त्याचे राहणे सत्त्वशील बनते. जगण्यासाठी - दैवी जीवन - जगण्यासाठी हीच योग्य भूमिका.

माझा निसर्गाशी काय संबंध आहे? ते पक्षी, ते आकाश, ते वृक्ष, ती पुष्पे -

तो खळाळता प्रवाह! हे तर माझेच जीवन आहे. केवळ पुरुष व स्त्री यांचा संबंध म्हणजे जीवन नव्हे. तर ती सगळी सृष्टी माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मी प्रत्येक वस्तुमात्राशी -चराचराशी - संबंधित राहिले पाहिजे. हेच जगत्प्रेम. त्याला मुकू नका. त्याला तुम्ही मुकलात तर सर्व श्रेय गमवाल.

परिपूर्ण जीवनासाठी आवश्यक आहे -

संवेदनक्षमता, जीवनाची समजूत, अक्रिय सावधानता, विकार रजितता याच गोष्टींनी जीवन परिपूर्ण होत असते. जो कुणी खरोखरीच नि:स्वार्थी असेल त्यालाच जीवनाचे हे शहाणपण लाभू शकते. ऋजुता, नम्रता या दैवी गुणांनी जीवन बहरते. डोळस मनच स्वच्छ पाहू शकते. असे मन भ्रममुक्त, निर्हेतुक व सिद्धांत रहित असते. तेथे मीपणा, अहंकार उरत नाही. मीपणाचा अंत झाला की, शांततेचा जाणीवपूर्वक भाव उपजतो. यच्चयावत चराचराबद्दल कमालीची अनुकंपा, आत्यंतिक जिव्हाळा व करुणा यांचा सर्वत्र प्रवाह फुटून निघतो. मीपणाने आणखी काही मिळवायचे राहत नाही. कोणत्याही तऱ्हेने मनाची चलबिचल होत नाही. अशावेळी आपल्या अंगी आगळया वेगळया शक्तीचा आविर्भाव होतो, उद्रेक होतो. यालाच सर्वोच्च स्थिती वा ईश्वरापर्यंत पोहोचलेली स्थिती समजायचे.

जीवनाच्या प्रवाहात विविध उर्मी असतात. कधी प्रेमभावनेची, हृदयाची उर्मी असेल तर कधी वैचारिक, बौद्धिक व मानसिक उर्मी असेल. तरीपण सर्वत्र हल्ली दिसणारी हिंसक, माणसाला जीवंत जाळणारी, क्रूर, निर्घृण इ. हिडिस गोष्टी करणारी उर्मी जी दिसते ती म्हणजे जीवनाचा प्रवाह कुंठित करणारी उर्मी वाटते. मात्र सर्वसाधारणत: या सर्वांचा समन्वय साधणारी उर्मी असावी की जी कृतीतले सौंदर्य पाहू शकेल. कर्म काय करावे, कृत्ये कोणती करावी, तुमच्या अंतरंगात काय घडते आहे हे अनुभवले पाहिजे. निर्हेतुक कर्म करावे. सृजनच कृतीशील व्हावे.

परमात्मा, ईश्वरीय सता ही व्यक्तीपरत्त्वे वेगवेगळी अनुभवली जातात. मात्र हा अनुभव प्रगट करता येत नसतो. कारण तो आत्माविष्कार असतो. संतांची वचने मैलाच्या दगडाप्रमाणे दिशासूचक असतात. आत्मज्ञानाच्या वाटेवर त्याचा डोळसपणे उपभोग करावा लागतो. मग मात्र आपण स्वत:च स्वत:चा मार्ग निर्माण करुन प्रवास करतो, वाटचाल करतो.

सर्व काही निसर्गनियमानुसार घडत असते. भविष्यकाळाची चिंता करीत रहाणे हा वेळेचा पूर्ण अपव्यय आहे. सर्वात उत्तम म्हणजे वर्तमानाचा जास्तीत जास्त उपयोग करणे. तुम्हाला खूप लांबचा पल्ला गाठायचा आहे. त्यासाठी आत्मविश्वासाने पुढे चला, तुमचे प्रश्न तुम्ही हाताळायचे आहेत व उत्तरे तुम्हालाच शोधायची आहेत. जिवंत वर्तमानात जगायला शिका.

## रोजची कामे हीच साधना

तुम्ही जर लक्षपूर्वक पाहिलेत तर तुमची रोजची कामे ही साधना बनून जाते. तुम्ही जे काही कराल ते सावधपणे पहा, आपल्याच विचारांचा मागोवा घ्या. प्रतिक्रियांचा आवाज ऐका. त्यात गुंतून पडू नका. तुम्हाला जाणवेल की हे रोजचे मन विलक्षण स्वच्छ, सावध, जीवंत, स्तब्ध, नि:शब्द, निर्विकार बनलेले आहे. पूर्ण सावधानता, तटस्थ जागरुकता या गोष्टी क्षणाक्षणाला सातत्याने साधणे हीच तुमची सर्वोत्तम साधना बनेल. यासाठी मूलत: तुम्ही कोण आहात? ह्या सत्याच्या शोधासाठी निर्भयता, धाडस, साहस, संकल्प, अतूट श्रद्धा, दीर्घप्रतीक्षा, असे साधकाचे गुण अंगी आणले पाहिजेत.

परमात्म्याचा बोध होणे ही इच्छा असेल तर तुमचे मन निरागस, शुद्ध, मुक्त होणे प्रथम अगत्याचे आहे.

नंतर त्या परिपूर्ण रिक्त, अलिप्त एकाकी अवस्थेतून केवळ एकमेव अद्वैत अवस्था येते त्यामुळे तुमचे मन अत्यंत ताजेतवाने बनते व चिरंतन आनंदात तुम्ही डुंबत राहता.

**उच्च धार्मिक जीवन -**

उच्च प्रतीचे धार्मिक जीवन कसे असते? अशा जीवनात विरोध, संघर्ष किंवा दु:ख, शोक यांना दूर सारुन जे आध्यात्मिक जीवन जगतो ते जीवन. सर्व प्राणीमात्रांवर सारखे प्रेम करणारे ते असते. त्याला रुढी, परंपरा यांची बंधने मान्य नसतात. देश धर्म यांच्या संकल्पनात पण तो अडकून राहत नाही. प्रचलित अर्थाने तो संस्कृती मानीत नसतो. हे मन विश्वात्मक पातळीवर जगते. एखाद्या देशाचे राष्ट्रीयत्त्व, विशिष्ट धर्माचे अनुयायित्व, पंथ, यांच्या बाहेर या मनाची धांव असते. हे सारे तत्त्वज्ञान व्यापक अर्थाने रोजच्या जीवनात उतरले पाहिजे.

**जीवनांत काय मिळवायचे?**

जीवनामध्ये मूलत: संघर्षाशिवाय राहणे हे महत्त्वाचे. संघर्ष, विरोध, द्वैत, दु:ख, वेदना, मनाची ओढाताण याशिवाय राहणे फार आवश्यक आहे. तोच परमार्थाचा परिणाम व अध्यात्माचा उद्देश आहे. अद्वैत स्थितीचा आविष्कार व्हावा, चांगुलपणा, शहाणपणा विकसित व्हावा, मनाचे स्थैर्य, शांती स्थिर रहावी, वृत्ती, प्रवृत्ती चांगली रहावी हेच मिळवायचे असते. अहो, आत्मज्ञान होणे म्हणजे तरी काय? स्वत:चे पूर्ण ज्ञान. ही जशी पहिली पायरी तशीच शेवटची पायरी. प्रत्येकाचे मूळ स्वरुप, अविनाशी आनंद स्वरुप, चैतन्यमय सच्चिदानंद, चिरंजीव, चिरंतन तत्त्व

आहे, याची पूर्ण खात्री होणे म्हणजेच आत्मज्ञान होणे होय.

आध्यात्मिक जीवनाचा पायाच मुळी जे काही सोसायला लागेल ते सोसणे हा आहे. जीवनातील बारिक सारिक अडचणी व मोठेमोठे प्रसंग व संकटे कुरकुर न करता बिनतक्रार सोसणे हाच आध्यात्मिक जीवनाचा पाया आहे.

तुम्ही तटस्थ बना व साक्षी बना. स्वत:ला कुठेही अडकवून न ठेवता ध्यानात राहून प्रकाशाकडे वाटचाल करा. मन निर्भर व मोकळे करीत राहा. तीच तुमची साधना बनेल. फक्त पाहणे, मोकळ्या व रिकाम्या मनाने अवलोकन करणे, अभिप्राय नको तर सावध निरीक्षण तेवढे असावे. सुखाचा शोध जर तुम्ही मनाच्या खऱ्याखुऱ्या टोचणीने करायला सुरुवात कराल तर मन:शांती मिळवाल व मनाच्या अंतर्गत बाबींचा शोध घेत घेत सुखसमाधानाच्या आड येणारी कारणे तुम्हाला सहज दिसून येतील. एकदा कारणे अवगत झाली की उपाय सापडेल. ईप्सित गवसेल. मग तुम्हाला एखाद्या निराळ्या साधन मार्गाची पण गरज उरणार नाही.

**प्रत्येकाची जीवनाची घडण वेगळी -**

प्रत्येकाच्या जीवनाची घडण वेगवेगळी असते. कारण व्यक्ती व्यक्तीला जीवनात निरनिराळी भूमिका पार पाडायची असते. माणसाच्या आयुष्याची घडी

बसविण्यात ज्याला प्रारब्ध किंवा कर्मगती म्हणून म्हणतात तिचाही हात असतोच.

विजेचे प्रकाशतत्त्व प्रगट होते तो बल्ब मुख्य वस्तू नसते. हाच न्याय सृष्टी निर्मितीला लागू केला तर सारे विश्व निरनिराळया सजीव आणि निर्जीव वस्तूंनी बनलेले असते, त्यांच्यात चैतन्य चित्शक्ती उत्पन्न होते व ते चैतन्य हेच मूलतत्त्व होय.

संपूर्ण निकोप आणि पवित्र असणं म्हणजे शहाणपणा. Sanity means to be wholly healthy & holy. संघर्षमुक्त कृतीशील जीवन जगणे शहाणपणाचे.

सकाळी उठतांना डोक्यात एकही विचार वा समस्या नसावी, हे फार चांगले. मनाला विश्रांती मिळाल्याची ती पावतीच. निद्रावस्थेत मन स्वत:ला ठाकठीक करुन घेत असते. तुम्हीच स्वयंदीप व्हा! आपल्या स्वत:साठी आपणच प्रकाश व्हायला पाहिजे. दुसऱ्याची तत्त्वप्रणाली, विचारसरणी किंवा इतर कोणत्याही मतप्रामाण्याच्या छायेखाली जर तुम्ही असाल तर तुम्ही स्वयंप्रकाशित होऊ शकणार नाही. To be a light to oneself स्वयंदीप व्हा!

भगवंत जे जे करेल ते सर्वांच्या हिताचेच करेल. उद्याचा दिवस त्याच्या इच्छेने यायचा आहे. असे मनाशी ठरवून निश्चिंत असावे. मी जगात फक्त रामाचा आहे व माझे प्रेम केवळ रामाच्या स्मरणात आहे हे जाणून मन भगवंताकडे लावावे. जे होते ते राम इच्छेने घडते व घडेल हा विश्वास बाळगावा.

*वडील १९७३ मध्ये गेले. आई एकटी पडली. ती आलटून पालटून मुंबईस माटुंग्यास दादांकडे व गोरेगावी माझ्याकडे राही. पण तिला स्वावलंबी करावे, आमच्या गावच्या घराचे भाडे तिला पुरेसे उत्पन्न देत असे म्हणून मी तिला आर्थिक स्वावलंबी हो व मानाने जग असे सुचविले. तिलाही ते सुरुवातीस योग्य वाटले. ती गावी राहू लागली. पण तिला डायबेटीस सतावीत असे व त्यासाठी Insuline Injection ती रोज घेत असे. गेली १० वर्षे तरी ही व्याधी तिला जडली होती व Insuline Injection मी तिला BARC तून पुरवत असे. तिला मी सही करणे, बॅंकेचे व्यवहार पहाणे ई.ची माहिती करुन दिली होती. ती जरी निरक्षर होती, तरी मराठीत व इंग्रजीत छान सही करी. तिचे कवी मन असल्याने तिची अनेक गाणी, अभंग, ओव्या पाठ होत्या. तसेच तिचा शिवलीलामृताचा ११ वा रुद्राध्याय, ४२ ओव्या, शिवस्तुती, मारुती स्तोत्र पाठ होते. ती भीमरुपी महारुद्रा म्हणत Insuline Injection मांडीला टोचत असे.*

*वडील गेल्यावर ती जेम तेम ६ वर्षे राहिली. पण डायबेटीस व रोजच्या Injection ला ती कंटाळली. पथ्यपाणी पण होते. त्यालाही ती कंटाळली. विशेष म्हणजे एकटी राहणे याचाच तिला वैताग वाटला असावा. तसे इतर नातेवाईक होते, पण तिच्या मनात मुंबईला यावे व रहावे असे असावे. मी मात्र आईची चांगली आर्थिक*

*सोय व औषधाची सोय करुन दिली या भ्रमात होतो.*

*शेवटी ती आजारी असल्याचे पत्र आले. मी जाऊन तिला घेऊन आलो. BARC Hospital मध्ये ठेवले. ती त्यातूनही सावरली व तिला घरी आणले. पण काही दिवसांनीच तिच्या आजाराने उचल खाल्ली. पुन्हा तिला BARC Hospital मध्ये ठेवले. पण त्याच दिवशी संध्याकाळी ५ चे सुमारास ती गेल्याचा मला माझ्या ऑफिसमध्ये फोन आला. मरणसमयी तिच्याजवळ कुणीही नव्हते. हा कसा पहा दैवयोग! ज्याचे त्याचे मरण विधिलिखित असते हेच खरे!*

*मला मात्र आर्थिक स्वातंत्र्याच्या नावाखाली तिला गावी ठेवले, पण ते तिच्या मनाविरुद्ध असावे असे राहून राहून वाटले व ती सतत रुखरुख मनास लागून राहिली. एक अपराधीपण मनाला वेळोवेळी जाणवत राहिले व याची काहीतरी शिक्षा मला भोगावी लागेल असे उगाच वाटून गेले.*

## शांती व स्थिर वृत्ती

शांती ढळायला बाहेरची परिस्थिती कारण नसून अंत:स्थिती हीच कारण आहे. ज्याचे मन शांत व चिंतारहित, तो शांतच राहणार. म्हणून भगवंतावर विश्वास ठेवून स्वस्थ बसावे. जगच्चालक राम आहे, ही भावना दृढ झाली तर शांती येईल.

कर्तृत्वाभिमान शांतीच्या आड येतो. विद्या, वैभव, कला, संपत्ती, संतती यांनी शांती मिळतेच असे नाही. निरपेक्षता हे शांतीचे मूळ आहे. मनाविरुद्ध गोष्ट घडल्यानंतर लगेच भगवंताची आठवण करावी म्हणजे शांती येईल. अशाने प्रमाद घडत नाही.

जगणे हे आनंददायक आहे. मात्र आपण कशाकरितां काय करतो हेच विसरतो. मग मनुष्य आनंदासाठी न जगता वस्तुंसाठी जगतो. वस्तुंपासून मिळणारे सुख अशाश्वत असते. व त्या आनंदासाठी माणूस दु:खदायक प्रपंचाची कांस धरतो. याकरिता कोणतेही कारण नसलेला आनंद भोगण्याची संवय आपण लावून घ्यावी. निरीच्छ, निष्काम वृत्तीने रहायला शिकावे. हे असे राहणे, ही फार उच्च अवस्था आहे. भगवंताशी अनन्य होणे ही ती अवस्था होय.

वाटे सकळही त्यजावे । काही सार्थक करावे ।
तरी मग देवाधिदेवे । मार्गी लाविजे ॥

आपल्या देहावर आपली सत्ता नाही, आपल्या पैश्यावर आपली सत्ता नाही, आपल्या माणसांवर आपली सत्ता नाही, म्हणून आपले कर्तव्य तेवढे करावे. ते करताना आपले मन दुश्चिंत होऊ देऊ नये.

मनुष्य देहात दैवी जीवन जगता येण्याची क्षमता आहे. मात्र त्यासाठी खालील गोष्टींची आवश्यकता असते:

१. जीवाला बंधनातून मुक्तता हवी वाटणे. जीवाचे सोने व्हावे ही मनापासून इच्छा असावी.

२. आपण ऐहिक प्रतिष्ठा, लाभ यांना जास्त महत्त्व न देणे.

३. बाहेरच्या गोष्टींपेक्षा आपल्या अंतर्मनात पहायला शिकणे.

४. अहंकार, दुष्ट वासना या आपल्यात नसाव्यात.

५. आपले आचरण शुद्ध हवे. लोभ, ईर्षा नको. निष्काम कर्म करावे.

६. सांसरिक मोहापासून शक्य तो अलिप्त. त्यात गुंतून पडू नये. त्यात नित्यानित्य विवेक शाधावा.

७. आपल्या मनावर व प्रत्येक कृतीवर ताबा हवाच. यासाठी विचारपूर्वक वागावे.

८. विषय वासना दंभ आपल्यांत नसावे.

९. याप्रमाणे आचरण ठेवले तर योग्य गुरुचे योग्य वेळी सहाय्य होते.

१०. तसेच परमेश्वर त्याच्या कृपेच्याद्वारे आपणांस सहाय्य करतो.

११. आत बाहेर सात्विक बनावयास हवे.

सर्व प्राणीमात्रात अविनाशी एकच परमात्मा भरलेला आहे. अशा समभावाने सर्वांकडे बघा. शास्त्राला धरुन केलेल्या कर्माला फळाची इच्छा नसते. जे करताना त्याविषयी ममत्व किंवा द्वेष दोन्ही नसते, असे कर्म करा. हे कर्म आसक्तीरहित अहंकार सोडून केलेले असावे. तसेच बुद्धीने काय काम केले पाहिजे ते ठरवावे. कारण बरोबर असेल तेच काम करावयास हवे. यासाठी धैर्याने व निष्काम बुद्धीने वागावे. ज्या कामाच्या शेवटी अमृततुल्य सौख्य लाभते असेच काम करावे. ते परिणामस्वरुप गोडच असते व आनंद देत असते.

खालील गोष्टी आचरणात आणाव्यात -

आपले आचरण अगदी शुद्ध ठेवा. आपला सांभाळ करणारा कुणीतरी आहे म्हणजे सद्‌गुरु / परमेश्वर आहे व तो जवळच सत्तारुपाने आहे ही जाणीव सतत जागृत ठेवा. भगवंताच्या नामानेच भगवंताची प्राप्ती होणार अशी खात्री अंगी बाणवा व तशी निष्ठा ठेवा. यालाच निष्ठेचे नाम म्हणतात. भगवंताची कृपा या मार्गाने होईल.

गुरुचरणी अत्यंत विश्वास

आणि साधनाचा अखंड सहवास

येथे प्रपंचाचा सुटला फास

हाच परमार्थाचा मार्ग आहे खास!

भगवंत नामभक्ती देण्यांत कृपण आहे. म्हणून तुझ्या नामाचे प्रेम दे हेच मागावे!

बारिक सारिक बाबींकडे कानाडोळा करावा. सर्वांना प्रेमाची अशी एक जागा शोधावी. व्यक्तिविषयक न बोलता, गोड सुचना करावी.

आपल्या स्वार्थाला दूर सारावे.

घरातले वातावरण शुद्ध व पवित्र ठेवा. दुसऱ्याचे मन दुखवू नये. सारासार विचार करा. एकमेकांशी सलोखा, प्रेम ठेवा. आनंदी वातावरण निर्माण होईल.

काळजी घ्या पण काळजी करु नये.

देहाचे भोग यायचेच. त्याला कंटाळू नका. निर्भय बना. जिवंतपणीच आपले मरण पहा! आतां जगणे रामासाठी हा निश्चय माना. तुम्ही भगवंताच्या प्रेमाने अगदी भरुन जा. आपापसांत प्रेम वाढवा. अंत:करणात भाव देवाचा ठेवा. तेथे भगवंत प्रगट होतो.

आपल्या आयुष्यांत घडणाऱ्या सर्व घटना परमेश्वराच्या सत्तेने घडून येतात अशी जाणीव ठेवा. सर्व जगताचा जो पालनकर्ता तो आपले पालन करीलच याची खात्री बाळगा.

जसे घडेल तसे घडू द्यावे. देह असा प्रारब्धावर टाकावा. बंधनाला खरे कारण परिस्थिती नसून आपल्याच मनाची ठेवण हे आहे. आहे त्या परिस्थितीत पूर्ण समाधानाने राहणे हीच देवाची कृपा होय. आपल्याला सांभाळणारी शक्ती आपल्या पाठीशी आहे असा विश्वास बाळगा. शांत वृत्ती राखावी. वृत्ती स्थिर असावीच.

# परमार्थ

परमार्थ हा आपल्याशीच करावयाचा अभ्यास, तो वृत्ती सुधारण्याचा अभ्यास आहे. परमार्थात नियम थोडा करावा पण तो शाश्वत असावा. कोणाच्या नकळत तो करावा. अनुभवाच्या प्रचीतीची अपेक्षा ठेवू नये! एकीकडून मनाचे संयमन व दुसरीकडून भक्तीचा जोर असला की परमार्थ लवकर साधतो.

साधना करण्यापूर्वी अशी तयारी करा -

१. अनित्य जो विषय त्याबाबत उदासीन रहा. नित्य जो भगवंत त्याच्याकडे लक्ष केंद्रित करा.

२. भोगाची वासना नाहीशी करा. बाह्य विषयाकडील लक्ष खेचून आणा व ते भगवंताकडे लावा. कामवासना पूर्ण घालवा.

३. हर्ष, विषाद न मानता संतोषाने रहा. मोह टाळा.

४. भगवंत भेटावा अशी आंतरिक तळमळ जागी करा.

जीवनात असे वागावे -

* अंतर्यामी स्तिर वृत्ती ठेवून स्वस्थ रहा.

* दगदग सोडून सावधानता ठेवा.

* सातत्याने आनंदात व संतोषाने राहण्याचा प्रयत्न करा.

* भगवंत काय म्हणेल हे ध्यानात ठेवून वागा.

* ज्यांत माझे मन मला खात नाही असेच काम करा.

शुद्ध असावे आचरण।

तसेच असावे अंत:करण।

त्यांत भगवंताचे स्मरण।
हेची प्रपंची सुखी असण्याचे साधन॥

म्हातारपणी मन व शरीर दोन्ही नाजूक बनतात. शरीर ठीक रहायला आनंद हे फार मोठे औषध आहे. हंसावे, खेळावे, लहान मुलांत मिसळावे, थट्टा विनोद करावा. अशा रीतीने आनंदात राहण्याचा प्रयत्न करावा. ज्याचा आनंद शेवटपर्यंत टिकला त्याच्याच जन्माचे सार्थक झाले म्हणायचे.

भगवंत भक्ताची संकटे नाहीशी करतो याचा अर्थ त्याची प्रापंचिक संकटे दूर करतो असे नाही. ती संकटे काय येतात व जातात, पण भक्ताला समाधानात ठेवून संकटे सहन करण्याची शक्ती भगवंत देत असतो.

भगवंत हा सहज साध्य आहे. सहज साध्य म्हणजे निसर्ग नियमानुसार आपल्याकडे येते ते सहज, म्हणून सहजसाध्य म्हणजे फळाची अपेक्षा, कर्तव्याचा अभिमान न धरता केलेली कृती. भगवंत म्हणूनच सुलभ साध्य नाही.

अशांती का? आपल्याला हवे ते न मिळाले म्हणून किंवा आपल्याला नको ते मिळाले म्हणून.

या दोन कारणांनी शांती बिघडते. मनस्वास्थ्य नाहीसे होते. जीवनाच्या

व्यवहारात नेहमी प्रयत्न आणि परमेश्वर यांची सांगड घालावी. सर्व काही रामाच्या इच्छेने होते आहे अशी दृढ भावना असावी. मरणाची भीती बाळगू नये, जगण्याची काळजी करु नये. नेहमी नामस्मरणात राहण्याचा प्रयत्न करावा. माझी काळजी घेणारा माझे रक्षण करणारा माझा त्राता माझे पालन करणारा तो भगवंत आहे असे मानून वागणे ही भगवंताबद्दलची खरी आस्तिक्य बुद्धी होय.

शेजार असता रामाचा।

दु:खाची, काळजीची काय वार्ता?॥

आपण ज्याला आपले म्हणतो ते खरे आपले नसतात. म्हणून आपण एका परमात्म्यालाच आपले मानावे. मी त्याचा आहे अशी सदासर्वकाळ आठवण ठेवावी. जे जे घडते आहे ते ते त्याच्या इच्छेनुसार होत असते हीच भावना ठेवावी. अशी भावना होण्यासाठी आपण त्याची उपासना करायला हवी. म्हणून त्याच्या नामस्मरणांत राहणे जरुरीचे. तो पण मग सदासर्वकाळ आपल्या जवळ राहतो.

सर्व दु:खांचे मूळ देहबुद्धी. आपले चुकते ते असे -

१. आपण स्वत:ला देह समजून राहतो. देह माझा समजून त्याच्यावर प्रेम करीत असतो.

२. जे विकार देहाला चिकटतात त्याचीच वाढ आयुष्यभर करीत राहातो.

३. हे विकार भरकटतील तिकडे आपण जातो. त्याची वाढ थांबवित नाही.

तरी पण देहभोग येतील ते येऊ देत. अशी भूमिका घ्यावी. देवाच्या मनांत ज्या स्थितीत ठेवायचे असेल त्या स्थितीत राहू दे पण मला त्या स्थितीत समाधान दे. असेच त्याच्यापाशी मागावे. काही मागावे अशी इच्छा होऊ नये हेच देणे मला दे असे अनन्य शरण जाऊन मागावे. त्यातच माणसाचे कल्याण आहे.

संसार, जग, माता, पिता, पुत्र, घरदार हे सर्व माझे नसून रामाचे आहे असा भाव ठेवावा.

# जीवनाचे ध्येय

दैवी जीवनासाठी आवश्यक -

१. मनोजय

२. वृत्तीजय

३. वासनाक्षय

४. आपले जीवनात कोणते ध्येय आहे ते नक्की ठरविणे.

५. व्यवहार दक्षता व नेहमी सावधानता. प्रत्येक कृती ध्येयाशी सुसंगत असावी.

६. न देखे परधन, न देखे परजाया.

७. राहे सदा स्वानंद स्मरणांत, वेळोवेळी आत्मपरिक्षण व्हावे.

८. परमेश्वर व आपण यातील अभेद तत्त्व. परमेश्वर अव्यक्त आहे, अलिप्त आहे. मायातीत आहे, निर्गुण आहे, निरंजन आहे, निष्कलंक आहे, तसेच स्वरुप माझे पण आहे. देह म्हणजे मी नव्हे. मला स्वत:ची ओळख जीवनात पटवायची आहे व परमेश्वराशी एकरुप व्हायचे आहे ही मनाची धारणा करावी.

९. जैसी ईश्वराची मांडणी। तैसे परी होतसे। तैसे घडे श्रुतिवचन। दु:ख कोणी करु नये॥ जैसे पेरिले असे शेत। तेवि उगवे परियेसा॥

१०. विवेकाने व अभ्यासाने आपली साधना ठरवावी. चित्तशुद्धी हा पाया. त्यानंतर गुरुकृपेने प्रगती होते. त्यासाठी शरणागत भावना हवी.

११. परमात्मा साक्षी आहे, तो माझ्या प्रत्येक कृतीकडे पाहतो आहे असा भाव धारण करता आला तर हळूहळू सगळीकडे परमात्माच ओतप्रोत भरलेला दिसू लागेल. आपण स्वत:चे कर्तेपण घालवावे. भगवंत सर्वत्र आहे हा भाव निर्माण होण्यास त्याच्या कृपेमुळे माझे जीवन चालले आहे आणि त्याच्या कृपेशिवाय मी जगणे शक्य

नाही अशी खात्री झाली पाहिजे.

१२. नाममंत्राला नाद आहे. त्याचा साधकाभोवती वलय तयार करण्यासाठी उपयोग होत असतो.

१३. मृत्यूनंतर येणारे गाठोडे सद्वासनांचे असावे एवढी तरी खबरदारी घ्यावी.

कार्यकारण भाव -

या विश्वाचा जन्म आपोआप झालेला नाही. या विश्वात कोणतीही गोष्ट आपोआप घडत नाही. या जगातील प्रत्येक गोष्ट ही कार्यकारण भावाने बांधली गेली आहे. या सृष्टीच्या जन्माचे कारण म्हणजे ईश्वरी संकल्प. आपल्या संकल्प इच्छेने त्याने एवढी प्रचंड सृष्टी निर्माण केली आहे. म्हणजे अव्यक्त तत्त्वाने आपल्या शक्तीने सर्व व्यक्तरुपे धारण केली व त्यांचे गुणधर्मही त्यानेच निश्चित केले.

आपण सर्व ईश्वराच्या शक्तीचा अंश आहोत. येथे मीपणाला स्थानच नाही.

आपण सर्व ईश्वराची विविध रुपे असून आपल्या माध्यमातून त्याने विविध गुणधर्म धारण केले आहेत व आपल्या जीवनाच्या माध्यमातून त्याचा पूर्व नियोजित ईश्वरी संकल्प प्रगट होत असतो. हा ईश्वरी संकल्प प्रगट होण्यापलीकडे आपल्या जीवनांत इतर काही घडतच नाही. हा ईश्वरी संकल्प सामान्य जीवाला कळत नाही म्हणून आपण करतो त्या गोष्टीचे स्वातंत्र्य आपण घेत असतो. पण खरे तर रामच कर्ता असतो.

म्हणून क्षणोक्षणी घडणाऱ्या घटनांविषयी तटस्थपणाची, साक्षित्वाची अशी सुसंवादी भावना आत्मियतेने ठेवावी. यासाठी अंतर्मुख व्हावे व स्वत: ईश्वरानुभूती घेत रहावे.

किंबहुना चराचर। आपणचि जाहला॥

सूक्ष्माच्या पायऱ्या –

बुद्धी मनाहून सूक्ष्म

आत्मतत्त्व बुद्धीहून सूक्ष्म.

वृत्ती या सूक्ष्म असतात. शरीराचे धारण पोषण अपरा प्रकृती करते. तिच्यामागे पराप्रकृती असते. पराच्या मागे ईश्वरी संकल्प असतो व त्यानुसारच सारे काही घडत असते.

यासाठीच राम कर्ता हा भाव ठेवावा.

तुका म्हणे ठेवी तैसे। आम्ही राहो त्याच्या इच्छे॥

भगवंत हा केवळ आहे. GOD is Being. ते केवळ अस्तित्त्व आहे. पण ते जड नाही. चित् म्हणजे ज्ञानरुप आहे. या चेतनामय असण्यांत एकसारखे जे स्फुरण होते ते स्फुरण म्हणजे आनंद. म्हणूनच भगवंताचे स्वरुप सच्चिदानंद आहे.

जीवन या चढत्या पायऱ्यांनी जगा -

Resolution - निग्रह

Conviction - दृढविश्वास

Determination – निश्चय

प्रत्येकास उपजणे, असणे, वाटणे, क्षीण होणे, नाश पावणे, हे टप्प्याटप्प्याचे विकार चुकलेले नाहीत. ते निसर्गनियमानुसारच आहेत.

यासाठी मी का जगतो याचा आत्मानात्म विवेक करावा.

मृत्यूची जागा, वेळ, जवळ कोण असणार, त्रास किती होणार, हे सर्व प्रारब्धाने ठरलेले आहे. म्हणून मृत्यूची काळजी करु नये. म्हातारपण त्रास देणारच हे विचाराने पटवून घ्यावे. जे जन्मते ते नाश पावणारच हे लक्षात ठेवावे.

सरता संचिताचे शेष। नाही क्षणाचा अवकाश।<br>
भरता न भरता निमिष्य। जाणे लागे॥

या करिता भीतीची भावना व असुरक्षितता घालविता आली पाहिजे.

आपले ध्येय असावे -

कां झांकलिये घटीचा दिवा।<br>
नेणिजे काय जाहला केव्हा।

या रीती पांडवा जो। देह ठेवी॥

भक्ताला परमेश्वराची आठवण ठेवता येते अशी अवस्था येतेच.

एकाकीपणाच्या ४ अवस्था –

* Sense of Loneliness - एकटेपणाची भावना

* Sense of Abandonment - टाकून दिल्याची भावना

* Sense of Isolation - वेगळे पडल्याची भावना

* Sense of Helplessness - असहाय्यतेची भावना

यासाठी You can have protection of the Devine Name, All the time, if you Totally Surrender to God. म्हातारपणी अगदी उत्तम अशी प्रकृती राहणार नाही  तरी जरुर तेव्हा शक्य व योग्य ते औषधपाणी करावे. प्रकृतीमुळे निराशा, निरुत्साह, चिंता निर्माण होणार नाही असे पहावे.

*नुकतेच मी वळचणीचे पाणी हे बाळ गाडगीळांचे आत्मचरित्र वाचले. त्यांनी आपल्या आईबद्दल ती कशी कर्तृत्त्ववान होती व तिच्यामुळेच तिच्या मुलामुलींना पुढे उच्चशिक्षणाचा लाभ मिळून त्या सर्वांची प्रगती झाल्याचे त्यांनी त्यात लिहिले. तसेच त्यांनी आईस त्यांचेकडे बरेच दिवस ठेवले होते. पण नंतर ती गावीं गेली. पुन्हा ज्यावेळी ती परतली तेव्हा त्यांनी त्यांच्या सासुबाई त्यांच्याकडेच होत्या म्हणून आईची सोय तिथेच पण एका स्वतंत्र खोलीत करुन दिली. आईकडे त्यांचे लक्ष होतेच. पण तिला ते एकटेपण जाणवत असेल. तिची कधी काही तक्रार नव्हतीच. पण काही दिवसांतच ती एकाएकी गेली व गाडगीळांना रुखरुख लागली की मी आईला स्वतंत्र खोलीत ठेवायला नको होते. आई जरी काही म्हणाली नाही तरी माझे हे चुकलेच. अशी रुखरुख गाडगीळांना लागली. म्हातारपणी मन मोठे हळवे होते पण इतरांना त्याची कल्पना येत नाही. पण असे काही अचानक घडते की मग अपराधी वाटायला लागते. माझी पण स्थिती अशीच झाली होती. माझ्या आईच्या बाबतीत. म्हणून गाडगीळांच्या आईची हकीगत मी सांगितली.*

*आम्हां तरुणांनी म्हाताऱ्या माणसांच्या मनाची स्थिती विशेष करुन लक्षात घेणे कसे आवश्यक असते हे या दोन हकीगतींवरुन स्पष्ट होते.*

*तसेच Maxim Gorky ने म्हटले आहे,*

*“How little do we think of our mothers” हे ही तितकेच खरे! असे वाटून जाते.*

## अंतर्यामी काय ते जाणा

अंतर्यामीची जाणीव

परमेश्वर माझ्या अंतर्यामी आहे. माझ्या सर्व कृती, माझे सर्व विचार, सर्व काही त्याला समजतात. त्याच्यापासून मी काहीही लपवू शकत नाही. अशी जाणीव झाली की माणूस वेडावाकडा वागणारच नाही. नामाला विरोधी अशा आपल्या वर्तनाचे मूळ वासनेत आहे. निर्वासन झाल्याखेरीज अंतर्यामीची जाणीव व्हावयाची नाही. जोपर्यंत पैसा, नातेवाईक, मित्र ई. चा आधार वाटतो तोपर्यंत शरणागती शक्य नाही.

जाणोनि नेणते करी माझे मन। तुझी प्रेमखूण दाऊनिया॥

मग मी संसारी असेन वर्तत। जेविं का जळांत पद्मपत्र॥

आपले ५ कोश -

१. अन्नमय - देहाचा कोश - यापुढील कोश सूक्ष्म शरीराचे

२. प्राणमय - हालचाल, चेतना, विकार

३. मनोमय - मन, विचार, मन नामात गुंतविले की १ व २ ताब्यात येतात

४. ध्यान - विज्ञानमय

५. समाधी - आनंदमय

तत् त्वम् असि -

एक लहान मुलगा आपली सावली पकडून पहात होता. ती त्याला सापडत नव्हती. शेवटी बापाने सांगितले की, स्वत:च्या डोक्यावर हात ठेव म्हणजे ती सापडेल. गुरुसुद्धा असेच करतो. शिष्याला तत् त्वम् असि म्हणतो व काम होते. परमात्मा आंतच जर आहे तर तो बाहेर शोधून सापडणार आहे?

परमेश्वराशी शरणागतीच्या तीन पायऱ्या -

१. माझ्या जीवनात व जगात जे काही घडते आहे ते सगळे बरोबरच आहे. मला अप्रिय वाटणारी गोष्ट घडली तरी ती बरोबरच आहे. ते करतात ते माझ्या हिताचेच करतात असे वाटले पाहिजे.

२. माझे कर्तृत्व खरे नाही. ते लंगडे आहे याची खात्री पटावी. मी अमुक करणार असे म्हणतो, ते घडतेच असे नाही.

३. म्हणून त्याचे कर्तृत्व खरे अशा विश्वासावर आरुढ होणे. हे साधले की, शरणागती पूर्ण होईल.

साधन कसे करावे?

१. To exist only for the Devine - केवळ परमात्मा भेटावा म्हणून जगावे.

२. To exist by the Devine - परमात्म्यामुळे जगत आहोत.

३. To exist only to Serve the Devine - परमात्म्याची सेवा करण्यासाठी जगणे.

४. To exist only by becoming Devine - परमात्मस्वरुप होऊन राहण्यासाठी जगणे.

वरील पैकी आपल्या आयुष्यात काही तरी साधावे.

साधन केल्याने दुर्बोधता, मनाची अपवित्रता, विपरित भाव, भीतीपर गोष्टी, इ. नाहीशा होऊन पवित्र दैवी सुख व आनंद लाभतो. भक्तीमध्ये आत्मसमर्पण असते. ध्यान, तपस्या, प्रार्थना, मंत्र या सर्वांमध्ये वाढ पुरेशी झाली की, दैवी कृपा अवतरते व ती आत्मसाक्षात्कार घडविते.

When there is need, Guru will help you. When Guru cannot, God will help you. When he cannot, His name will help you.

म्हणून नामाच्या संगतीत राहण्याचा प्रयत्न करावा.

आणखी एक वाढदिवस

याचा अर्थ मृत्यूच्या आणखी जवळ गेलो.

म्हणून साधनाची निकड लागली पाहिजे. यासाठी सत्संग हवा. नामस्मरण वाढावे. अहो, हाक आली परमेश्वराची, की जाता आले पाहिजे.

वाटसरु वाटे आले। पहाट होताच निघून गेले।

शरण असतां एका जनार्दना। ऐसे असतां भय कवणा?॥

हा आदर्श डोळयासमोर हवा.

दृश्य विश्व मूळ घर नव्हे! -

या दृश्य विश्वामध्ये आपण येतो व जन्ममरणाच्या चक्रात अडकतो. हे काही आपले खरे निवासस्थान नव्हे. स्वत:च्या मूळ घराकडे गेल्याशिवाय जीवाला चैन पडत नाही. सद्‌गुरु आत्मस्मृती देतात व स्वानंदरुप स्वगृही पोहोचवतात.

आपला जीव म्हणजे कालप्रवाहामध्ये वाहणारे ईश्वराचे सांत रुप होय. ईश्वर अत्यंत सूक्ष्म व पवित्र आहे. आपले अंत:करण त्याच्यापर्यंत पोचण्यास तसेच सूक्ष्म व पवित्र झाले पाहिजे. विवेकाने नको त्या गोष्टी बाजूला केल्या की, आत्मवस्तूचे चिंतन करणे शक्य होते व तशी पात्रता येते. जीव  शिवाकडे जाऊ शकतो. जीव अल्पशक्ती असला तरी चित्शक्तीच्या सहाय्याने तो ईश्वर दर्शनापर्यंत जातो. हृदयांत जीव व शिव यांचे ऐक्य होण्यासाठी सद्गुरु कृपा व्हावी लागते.

आत्मसाक्षात्कार होण्यासाठी अंत:करण अतिशय शुद्ध व निर्मल व्हावे लागते. कोणत्याही दृश्य व अनित्य वस्तूकडून यत्किंचितही वासना नसणे जरुर आहे. त्यामध्ये थोडी जरी वासना शिल्लक राहिली तरी ते आत्म्यापर्यंत पोहचू शकत नाही.

दृश्याचे प्रेम सुटून एकदा का आपण अंतर्मुख झालो की, हृदय ईश्वर (किंवा आतला आवाज) आपल्याला निश्चितच स्पष्ट मार्गदर्शन करतो.

## ज्ञानप्राप्तीची साधने

ज्ञानेंद्रिये व बुद्धी ही ज्ञानप्राप्तीची दोनच साधने आहेत. ही समजूत पुरेशी नाही. अंत:स्फूर्ती व प्रचीती ही आणखी दोन साधने मानणे भाग आहे. इंद्रियातीत वस्तूंची ओळख या दोन साधनांमुळे होऊ शकते.

ज्ञानेंद्रियांचे नियंत्रण मनाकडे आहे व मनाला मनन, विचार तसेच कल्पना करण्याचे सामर्थ्य आदिशक्तीकडून मिळते व त्या आदिशक्तीलाच ईश्वर मानले जाते.

ईश्वरी मानवी जीवन दीपस्तंभाचे किंवा होकायंत्राचे काम करतो. मनाचा कौल मिळतो व त्यासाठीच सुसंस्कारित मन हवे.

To know God, you have to become God. God happens when “I” in you is no more.

देव शोधायासी गेलो। देवची होऊनी ठेलो॥

प्रार्थना -

प्रार्थनेच्या करुणाघन शब्दांनी क्षितीजे नतमस्तक होतात. तेव्हा जगण्यातला सुंदरतेचा, देवत्वाचा साक्षात्कार होतो. देव म्हणजे आत्मप्रकाशाची यथार्थ जाणीव, जे जे भव्य, उदात्त आहे ते ते ईश्वरीय आहे. सुंदर जगणे म्हणजे देवत्व.

दु:खभोग, वेदना, मृत्यू अटळ आहेत असे ख्रिस्त शिकवतो. स्वत:च्या जीवनाला गव्हाच्या दाण्याची उपमा प्रभू देतो. रुजण्यासाठी दाणा मातीत पडावा लागतो. तो संपूर्ण मातीत रुजल्यावरच कोंब फुटतो. नव्या जन्मासाठी वेदनेची किंमत देणे त्यालाही आवश्यक होते. सकारात्मक दृष्टीकोनातून जीवनाला सामोरे जायचे ठरवले की, कर्तव्याचा क्रूस वाहण्यासाठी आत्मिक बळ लाभत असते. ईश्वर जसा आपल्या अस्तित्त्वाची भूमी आहे तसा तो आपल्या डोक्यावरील छत्र पण आहे.

जीवनाची वाटचाल करण्यासाठी देवाची संकल्पना म्हणजे आपल्या जीवनावरील आदर्शाला प्रेरित करणारा, सर्वांकडे सम भावनेने पहायला शिकविणारा तो देव व अशा देवाची उपासना जरुर करावी. त्यासाठी कोणत्याही कर्मकांडाची, पूजा, व्रतवैकल्याची मुळीच आवश्यकता नाही.

देव कुठे देव कुठे, तुझ्या बबुया मझार ।

देव कुठे देव कुठे, आभायाच्या आरपार ॥

(बहिणाबाई)

विश्वात्मक देव -

देव विश्वात्मक आहे. सर्व आकारांना, नामरुपांना व्यापून त्याच्या अतीत असणारा, अस्तित्वाचा मूल स्त्रोत म्हणजे ईश्वर.

वैश्विक वास्तवाच्या अथांग व्याप्तीतून कोणतेही अस्तित्व आविष्कारित असते. ते विश्वरुपाने  आविष्कारिते त्याहून आपण भिन्न नाही. स्वरुपाने आपण तेच आहोत. तत् त्वम् असि।

आपले अस्तित्व पूर्णतेचा आविष्कार आहे. तरल मनाला त्याचा प्रत्यय येऊ शकतो. पूर्णातूनच पूर्ण प्रगटत असते. या आविष्कारात मूळचे पूर्णत्व अबाधित रहाते.

विमुक्त मनाला सभोवतालच्या सृष्टीच्या स्पंदनाशी आपली स्पंदने निगडित असल्याचे जाणवू शकते. या सृष्टीचे आपणही एक घटक आहोत हे जुळत्या स्पंदनात जाणवू लागते.

वस्तुत: या विश्वात नवीन काही निर्माण होत नाही व नाशही पावत नाही.

केवळ रुपांतरण होत असते. एकच अनेक रुपात विलसते व हे अनेकत्व अखेर एकत्वात विलीन होते. ही विश्वव्यापी एकात्मतेची वास्तवता जाणून विकसित करणे हे निरतिशय सुख आहे. विविक्षिताच्या मर्यादेतून मुक्त होऊन व्यापकाशी समरसण्यात सुख आहे. आपल्यापैकी प्रत्येक जण सामर्थ्याचे, यशकिर्तीचे, आनंदाचे निधान आहे. दुबळेपणा सोडून, मी प्रकाशसूर्य आहे, मी अनंताचा अंगभूत भाग आहे, मी अवध्य आहे, मी नवरचना करु शकतो. असा संपन्न आत्मविश्वास तुम्ही अंगी बाळगा. मरणाला बाजूला ढकलून तेज:पूर्ण दीर्घ आयुष्य उपभोगा. धष्टपुष्ट व्हा. समृद्ध व्हा. सत्कर्मांनी शुद्ध व सुंदर जगा.

ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे,

आता कोदंड घेऊनी हाती । आरुढ पां इये रथी ।
देई आलिंगन वीरवृत्ती । समाधाने ॥

असे तुम्ही यशकीर्तीचे, आनंदाचे निधान आहात.

मी तूच आहे

तस्यैवाहम् = मी त्याचा आहे.

तत्वैवाहम् = मी तुझा आहे.

त्वमेवाहम् = मी तूच आहे.

शब्दज्ञान पुष्कळ झाले आणि अनुभव थोडाही नाही आला तर जन्म वाया गेला असे समजावे. त्या निर्विकल्प निराकार निरंजन देवाची ओळख झाली तरच जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका व्हावयाची. खरे म्हणजे आपण आपल्यालाच जाणावयाचे आहे. ते शाश्वत ब्रह्म आपणच तर आहोत. आपले काम इतकेच. सदासर्वदा, प्रात:काळी, माध्यानकाळी, सायंकाळी, सर्व काळी हृदयात राम साठवून अखंड नामस्मरण करायचे.

ज्या व्यक्तीचा, समाजाचा, राष्ट्राचा अंतरात्मा सदा जागृत (म्हणजे ज्या प्रमाणात ईश्वराच्या जवळ गेलेले), चेतवलेला, ती व्यक्ती, तो समाज, ते राष्ट्र भाग्यवान! जागृत अंतरात्मा, त्याची उपासना, ज्ञान जाणीव, विवेक, व्याप, प्रयत्नांची पराकाष्ठा ही त्यांच्या भाग्याची कारणे होत.

जीवनात आपल्या वागण्याने कुणाही जीवाला आपण संतोष देऊ शकलो तर ती भगवंताचीच पूजा होत असते. प्राणीमात्राची, माणसांची सेवा केली तर ती

परमेश्वराची पूजा होते.

नारायण असे विश्वी। त्याची पूजा करीत जावी।
या कारणे तोषवावी। कोणी तरी काया।
पूज्य पूजेसी अधिकार। उगेचि तोषवावे इतर।
दुखवू नये कोणाचे अंतर। म्हनिजे बरे॥

# निस्पृह धर्म

हाच तो निस्पृह धर्म

१. आळकेपणाने द्रव्य, दारा यांचेकडे पाहू नये.

२. भोगी मन असू नये.

३. कष्ट करण्याचा खेद मानू नये.

४. आपले ध्येय धोरण ठाम असावे.

५. जो आपले मानीत नाही, त्याला सांगत बसू नये.

६. साधे रहावे. काही मान इच्छू नये.

७. काम हलक्या प्रतीचे असले तरी ते करावे.

८. प्रसंगाशिवाय बोलू नये. अविचारीपणा नको.

९. स्वार्थबुद्धी नसावी.

१०. उपासनेत अंतर पडू देऊ नये.

११. नि:स्पृहवृत्ती ठेवावी. कुणाचे ओशाळे होऊ नये.

१२. प्रयत्नदीर्घ असावा. अवघड कामे प्रयत्नाने साधावी.

१३. विचार - उच्चार - आचार यांचा मेळ असावा.

१४. दुश्चिंत कदापि नसावे.

१५. शांती ढळू देऊ नये.

खालील दहा गुण आचरणांत आणावेत – १. साधी वृत्ती २. लीनता ३. सहनशीलता ४. निरलसता ५. संतोष ६. आर्जव ७. जनप्रियत्व ८. मनापासून काम करावे ९. मागचे विसरावे, पुढचा विचार करावा १०. परमार्थ साधावयाचा.

विषयाचिया बरडी । अखंड घासती तोंडी ।
ते इंद्रिये गोडी । न घेपती हे ।

बरड (नापिक) जमिनीवर गुरे गवत खात असता, त्यांचे पोट न भरतां, त्यांची तोंडे घासून घासून रक्ताळतात. त्याप्रमाणे विषयरुपी बरड जमिनीवर इंद्रिये सुख इच्छेने तोंड घासतात पण सुख न पावता दु:खीच होतात. अशी इंद्रिये सुख इच्छेने तोंड घासतात पण सुख न पावता दु:खीच होतात. इंद्रिये हा शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध या पाच विषयांस प्रत्यक्ष जाणतात. या इद्रियांना आत्म्याचे प्रत्यक्ष ज्ञान संभवत नाही. कारण आत्मा हा शब्द स्पर्श रुप गंधरहित आहे. म्हणून इंद्रियांना त्याचे प्रत्यक्ष ज्ञान होणे शक्य नाही. इंद्रिये ही बाहेर आहेत व आत्मा हा आंत आहे. त्यामुळे इंद्रियांना आत्म्याची ओळख होत नाही.

सर्व जगतभासात एक चिन्मत्र रहस्यावाचून दुसरे काही नाही. ते चिन्मात्रतत्त्व जगद्भासाच्या पूर्वीही होते व जगद्भासाच्या अंतीही राहिल. जगताच्या आदि आणि अंती एका चित्प्रकाशापरते दुसरे तत्त्व नाही.

सच्चिदानंद आत्मतत्व हे माझे स्वकीय रुप आहे. देहादिक प्रपंच कल्पित, असत् आहे. ज्या जीवाने हे दृढपणे जाणले तो मुक्त समजावा. अनेक फुले असतात पण त्यातून निघणारा परिमल एकच असतो. तसे, हे विश्व जरी अनेक नामरुपात्मक आहे, तरी या विश्वातून सत्तारुपाने एकच ईश्वरतत्त्व आहे.

ह्या अति आनंदरुपी स्वात्मप्रत्ययात सर्व प्राणिमात्रांत सारखेच सुख सामावलेले आहे. जसे मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत सर्वांना सारखाच आनंद मिळतो. अनुभवामृत म्हणजे सच्चिदानंदरुप नित्यमुक्त आत्मभाव. या आत्मभावाची व्याप्ती शिवापासून तृणापर्यंत एकसारखीच आहे!

नव्या निर्मितीसाठी पृथ्वी आपल्या उरात नांगरांचे तीक्ष्ण फाळ खुपसून घेते, तेव्हाच तिला मातीतून धान्याचे पीक काढण्याचे सामर्थ्य येते. तसे रंजल्या गांजल्यांसाठी स्वत:चे काळीज फाडून द्यायला तयार असावे लागते तरच सामाजिक

व सांस्कृतिक परिवर्तने घडून येण्याची शक्यता निर्माण होते.

मळिये जे उते नेले। ते उते निवांतचि गेले ।
तया पाणिया ऐसे केले । हो आवे गा ॥

मन-देह-वाचा यांच्याकडून जे कर्म घडेल ते मी करतो असे मानू नये. करणे न करणे हे ईश्वर जाणतो. माझा त्याच्याशी काही संबंध नाही, अशी निरहंकाराची वृत्ती धरावी. माळी नेईल तिकडे पाणी जाते तसे ईश्वर घडवील ती कर्मे होऊ देत. चित्तात ईश्वराचे अखंड स्मरण असू द्यावे व आनंदात रहावे. साधन सोपानाच्या या चढत्या पायऱ्या आहेत.

*२००१ हे साल आम्हां कुटुंबियांना वाईट गेले. तसे पाहिले तर एप्रिलमध्ये मी इगतपुरीला विपश्यनेचा कोर्स केला. परमेश्वराने तो कोर्स माझी सहनशक्ती वाढावी म्हणून करवून घेतला असला पाहिजे. कारण त्यानंतरच वाईट कालाची सुरुवात झाली. सौ. चे डोळ्याचे मोतीबिंदूचे operation चांगले पार पडले. तिने नंतर ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचे चरित्रपण वाचले. जून महिन्यापासून मात्र त्रासास सुरुवात झाली.*

*तिला कावीळीची लक्षणे दिसली. काही खाल्लेले नीट पचेना. उलट्या सुरु झाल्या. भूक लागेना. सोनोग्राफी केली. त्यात यकृताचा एक भाग कमी झालेला दिसला. म्हणून यकृताचे तज्ञ डॉक्टरांकडे तपासले. तेव्हा त्यांनी आजार गंभीर असून बरेच दिवस औषधोपचार घ्यावा लागेल असेही सांगितले. मात्र आजार औषधोपचाराने आटोक्यात येईल असेही सांगितले. त्याप्रमाणे मग उपचार सुरु झाले.*

*एखादा आठवडा बरे वाटायचे. आठवडा संपत आला, विशेषत: दर शुक्रवारी तिची प्रकृती बिघडायची व आजाराचा जोर वाढायचा. होणाऱ्या उलट्यांचा त्रास तीच सहन करु जाणे. नंतर पोटात पाणी व्हायला लागले. तज्ञ*

डॉक्टरांचे म्हणणे की यावर काही उपाय नाही. आहेत तीच औषधे चालू ठेवा. बरेच वेळा पोटातले पाणी काढायला लागायचे. माझा मुलगाच एम.डी. असल्याने तोच हे सर्व करायचा.

अशी सर्वतोपरी काळजी घेत असताना आजाराचे गंभीर स्वरुप लक्षात घेत तिला जसलोक हॉस्पिटलमध्ये १ नोव्हेंबर रोजी दाखल केले. तिथे तज्ञ डॉक्टरांनी उपचारांची शर्थ केली. थोडी सुधारणा दिसू लागली. मात्र तिथल्याही डॉक्टरांनी हा रोग असाध्य आहे असे सांगितले. विविध टेस्ट घेतल्या तेव्हा स्पष्ट झाले की यकृताचा फार थोडा भाग शिल्लक राहिला आहे. तिचे आयुष्य काही कालापुरतेच उरले आहे. ती थोडी खोलीत चालू लागली. आम्हांला उगाच वाटले की आतां यापुढे सुधारणा होईल. पण कसचे काय, येणाऱ्या शुक्रवारी तिची तब्येत अचानक रात्री बिघडली व ती असंबद्ध बडबडू लागली. माझी मुलगी तिच्या जवळ होती. ती धीराची म्हणून डॉक्टरांना बोलावून उपचार केले. दुसरे दिवशी सायंकाळपर्यंत तिची बडबड थांबली. २४ तारखेपर्यंत ती हॉस्पिटलमध्ये होती. येणारा शेवट शांततेत घरीच व्हावा म्हणून तिला त्या दिवशी डिस्चार्ज घेऊन घरी आणले.

घरी एक आठवडा परत व्यवस्थित गेला. थोडी सुधारणा वाटली. उपचार सुरुच होते. मुलगा अहोरात्र खपत होता. मी तर तिला Replica of God समजून तिची मनोभावे सेवा सर्वतोपरी करीत होतोच. शिवाय तिन्ही मुलीपण त्यांच्या परीने

मदत करीत होत्या. आप्तेष्ट भेटून जात होते. येणाऱ्या शुक्रवारी तिची तब्येत परत बिघडली. असे आलटून पालटून होत गेले. शेवटी एका बुधवारी ती कोमात गेली. खाणे पिणे बंद झाले. नाकातून नळीद्वारे अन्न भरविणे सुरु झाले. कोमात जाण्याआधी तिला कळून चुकले होते की, तिचा शेवट जवळ आला आहे. तिने एका रात्री रात्रभर कलावती मातेची भजने मोठ्याने म्हटली. तिचा आवडता अभंग –

बोल हरी बोल हरी । हरी हरी बोल।
केशव माधव गोविंद बोल ॥

सतत म्हणत राहिली. मुलगी जवळच होती. तिला सांगितले की, 'चार वाजता जाणार. आता मला काही नको. मी पूर्ण समाधानी आहे.' दुसरे दिवसापासून ती कोमात गेली. तिने साऱ्यातून जणू लक्ष काढून घेतले.

त्या दिवशी गुरुवार होता. मी आप्तांना फोन केला. तिची मामेबहिण त्याच दिवशी आली. ती रडायला लागली तर कोमात असून सौ.पण रडू लागली. तसा आवाज आतून तेवढा निघाला. मात्र त्यानंतर तिची हालचाल पूर्ण थांबली.

*गुरुवारी व शुक्रवारी दोन दिवस नर्स होती. तिचेही म्हणणे पडले की केव्हाही काही होऊ शकते. सर्व आप्तेष्टांना बोलावून घेतले होते. अवती भवती ४०-५० लोक तरी असावेत. दि. २१ डिसेंबर, शुक्रवारी दुपारी दिड वाजेपासून तिची प्रकृती अधिक चिंताजनक बनली. आता शेवट शांततेतच होऊ द्यावा असे सर्वानुमते ठरले. त्यादिवशी चंपाषष्टी होती. मी रामरक्षा, मारुती स्त्रोत्र, गायत्री मंत्र यांचे पठण सुरु केले. अवतार मेहेरबाबांची प्रार्थनाही म्हटली गेली. सर्व लोकांनी गंगा तुळशीपत्र तिला दिले. सर्वांनी दिलेले पाणी मात्र तिने ग्रहण केले. ४ वाजेच्या सुमारास तिच्या नाकात नळी होती त्यातून रक्त बाहेर आले. तिचा शेवटचा श्वासोश्वास सुरु झाला व तिला श्वास घेण्यास प्रयत्न करावा लागतो आहे हे दिसले. शेवटचा श्वास ४॥ वाजता तिने घेतला व सर्व आटोपले. मुलाने "आईऽ" म्हणून हंबरडा फोडला. दुसरी मुलगी ओक्साबोक्शी रडायला लागली. सर्वांच्या डोळयांत पाणी आले. माझी जीवाभावाची सखी मला सोडून गेली. मी एकटा एकटा पडलो. शेवटी व्हायचे तेच झाले.*

*म्हातारपणी खरे तर पती पत्नी यांची एकमेकांना सोबतीची फार जरुरी असते. पण काय करता? कालाय तस्मै नम:। त्या परमेश्वरी इच्छेपुढे आपले कुठे काय चालते?*

*तिचा शेवट घरीच झाला व ती एकंदरीत त्यातल्या त्यात शांततेत गेली हीच समाधानाची गोष्ट! रामनामाच्या गजरात, गायत्री मंत्राच्या उद्घोषात*

*प्रार्थनेच्या वातावरणात व सभोवती सर्व आप्तमंडळींच्या देखत तिने शेवटचा श्वास घेतला यातच सारे काही आले! सारा सोहळाच जणू! तिच्या इच्छेप्रमाणे तिचे नेत्रदान केले.*

*सरता संचिताचे शेष।*
*नाही क्षणाचा अवकाश।*
*भरता न भरता निमिष।*
*जाणे लागे॥*

*मी आता एकटा पडलो खरा! पण तसा माणूस हा एकटा कधीच नसतो हे आध्यात्माने मला शिकविले आहे. म्हणून एकटे राहाण्याची भीती मात्र मुळीच वाटत नाही. शिवाय एक वर्ष उलटून गेले तरी तिची साथ (अदृश्य रुपाने) मला लाभतेच आहे. असा आजवरचा अनुभव आहे. निर्णय घेताना प्रेरणा मिळते. वेळोवेळी सुचना मिळते हेही नसे थोडके!*

*आईच्या एकटे राहण्यास मी जबाबदार असेन तर माझी एकटे राहण्याची शिक्षा मला भोगलीच पाहिजे. नाही का? करावे तसे भरावे!*

*हा शेवटचा भोवरा तर खराच मला गटांगळ्या घ्यायला लावणारा! बघू*

*यातून मी किती दिवस तग धरतो ते!*

*माळियाने जेउते नेले। तेउते निवांतची गेले ॥*

*तया पाणिया ऐसे केले। होआवे गा ॥*

*माळी नेईल तिकडे पाणी जाते, तसे ईश्वर घडवील तसे होऊ देत.*

## सद्गुरु वाचूनी सांपडेना सोय!

ठरविलेल्या सिद्धांताप्रमाणेच जीवन रुळावरुन चालेल असे होत नाही. परिस्थिती बदलत असते. प्रत्यक्षात अपेक्षा पूर्ण होतीलच व समाधान लाभेल याची शक्यता कमीच असते. जीवन हे समुद्राकडे धावणाऱ्या नदीप्रमाणे आहे. काय, केव्हा, कुठे वाट्यास येईल कुणी सांगावे? मनासारखे नेहमी घडेल अशी खात्री नसते. म्हणूनच तर आपल्या जीवनात अस्वस्थता, काळजी, भीती, असुरक्षितता या गोष्टी अनुभवास येतात.

या सर्वांतून काही मार्ग आहे काय? विश्वाला चालविणाऱ्या प्रचंड शक्तीला शरण जाणे किंवा सद्गुरुला शरण जाणे हाच तो मार्ग होय.

विश्व चालविणाऱ्या अज्ञात शक्तीला नियती वा प्रारब्ध म्हणतात. ती आपल्या जीवनात कोणत्या वेळी काय उलटापालट करेल याचा अंदाज कोणालाच करता येत नसतो. म्हणूनच ज्या व्यक्तीमध्ये विश्वशक्ती साकार होते अशा सद्गुरुला मनाने घट्ट धरणे हाच रामबाण उपाय जीवनातील काळजी, भीती, अस्वस्थता व असुरक्षितता दूर करण्याचा आहे, हे अनुभवाने सिद्ध झालेले आहे.

संताला, गुरुला, घट्ट धरणे म्हणजे त्याला आपल्या जीवनात सर्वात महत्वाचे स्थान देणे होय. नामस्मरण करणे म्हणूनच महत्त्वाचे. मग आपले समाधान भंगत नाही. नाम ही भगवंताला मारलेली हाक आहे.

जीवनातल्या प्रत्येक घटनेत त्याची इच्छा पाहता आली पाहिजे. What thou willest. तुझी इच्छा ती माझ्या हिताची असे वाटले पाहिजे.

नामस्मरणाचा Dynamic Aspect म्हणजे नामासाठी नाम घेणे. त्यातून अमुक व्हावे, समाधान मिळावे, ज्ञान मिळावे असे वाटू देऊ नये. साधन करावे व त्यांत भावनेचा ओलावा ठेवावा. नामच सर्वस्व करावे. एका जन्मात होणारी ही गोष्ट नाही!

जे जे घडते ते ते त्याच्या इच्छेने घडते व ते बरोबर आहे अशी आपली या भक्तीमार्गात भावना होते. आपल्या वाट्याला जे कर्म आले आहे ते भगवंताशी तादात्म्य ठेऊन करायचे. यासाठी सर्व जीवन सहजपणे जगा आणि त्याच्याकडे साक्षीभावाने पहा. सद्‌गुरु मला सदैव पाहतात असा भाव मनी बाळगावा. जे काही साधन आपल्याकडून होते ती गुरुकृपा समजावी. प्रत्येक घटनेत त्याचा हात पहावा. सत्पुरुष देहातच असतात असे नाही. ते कोणत्याही रुपाने येऊन संगत देतात. आपले रक्षण करणारे असतात. Guardian Angel बनतात. म्हणूनच Surrender your body, heart & soul to the Devine. नाम सर्वश्रेष्ठ आहे ते मनाने घट्ट धरावे.

नाम घेतांना मी नाम घेतले आहे, ही जाणीव अवश्य ठेवावी. विकार ताब्यात राहून साक्षीत्व येईल, सत्यत्त्व येईल. नाम हेच सर्वस्व होईल. गुरुवचन, सत्संग, सद्ग्रंथ असा अभ्यास होईल. नामातले गुरुमहाराजांचे अस्तित्त्व सत्तारुपाचे आहे.

तुकाराम महाराज म्हणतात,

जाणावे ते काय, नेणावे ते काय ।
ध्यावे तुझे पय, हेचि सार ॥

येथे हे स्पष्ट केले पाहिजे की, आपण गुरुमहाराज म्हणतो तेव्हा एखाद्या विशिष्ट व्यक्तीची आठवण नसते. ते एक तत्त्व असते. राम हा दाशरथी राम खराच पण त्याच्याही पलिकडे जे रामतत्त्व आहे व ती विश्वजाणीव आहे. खूण म्हणून ती ओळखा. रामनाम लिहिलेले पाषाण, सेतू बांधताना पाण्यावर तरंगले. पण प्रभूरामचंद्रांनी स्वत: टाकलेले पण रामनाम न लिहिलेले पाषाण मात्र पाण्यात बुडाले ही गोष्ट सर्वांनाच ठऊक आहे. व्यक्तीपेक्षा प्रतिपादलेले तत्त्व महत्त्वाचे व त्याचेच अनुकरण सामान्यांनी करायचे असते.

आपले मन इतके श्रद्धासंपन्न व्हावे, की जीवनातला कुठलाही प्रसंग अहिताचा वाटता कामा नये. त्यामध्ये तटस्थता ठेवावी. कर्तव्याची भावना व तटस्थता असा संगम हवा.

परिस्थिती कशीही असो ती सद्‌गुरुची कृपा आहे असे मनोमन वाटणे यासाठी प्रथम हवे नको पण जायला हवे.

आज माझी जी परिस्थिती आहे त्यात प्रत्येक गोष्ट तुझ्या इच्छेने घडते आहे अशी स्वत:ला जाणीव करुन द्यायची. सर्व काही राम इच्छा! By the will of Rama, everything happens.

जे जे घडते ते ते माझ्या कल्याणाचेच असते. ज्याचा देहाशी संबंध नाही असे काही तरी देहात आहे व ते देहात असून देहाच्या पलिकडे आहे. ते अतिशय फ्रेश म्हणजे ताजेतवाने आहे. चिन्मय आहे. हा अनुभव तुम्ही घ्यावा. याचा अभ्यास करावा. या अभ्यासाला प्रार्थनेची जोड द्या. तळमळून प्रार्थना करा. आयुष्यात एवढे साधले तरी पुरे!

कबीराचा दोहा आहे. त्यांनी गुरुला कुंभार आणि शिष्याला तो घडवीत असलेला कुंभ म्हटले आहे.

गुरु कुम्हार शिष्य कुंभ है, घडिघडि काढै खोट ।

अंदर हाथ सहार दैं, बाहर मारै चोट ॥

शिष्याचे दोष नाहीसे करण्यासाठी बाहेरुन थप्पड मारलेली दिसली तरी त्यातून त्याच्याच हाताचा आधार असतो.

## पूर्णत्त्वाकडे

केवळ ईंद्रियांच्या सुखात लोळण्यासाठी हे जीवन असते तर पशूंमध्ये व माणसात फारच थोडा फरक राहिला असता. आपल्या भावना, विचार, आकांक्षा, आपल्या जीवनाचे अंग होत. एका महान आदर्शासाठी, पूर्णत्त्वासाठी, केलेली धडपड हा देखील जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो व या आदर्शामुळेच जीवनाला काही अर्थ प्राप्त होत असतो. पूर्णत्त्वाकडे जाणे हेच म्हणून खरोखर जीवनाचे सार आहे.

जिचा 'क्षुद्र मी' मरुन गेला आहे, असा माणूस सारे जग हालवून टाकत असतो व साऱ्या जगाला आपल्या इशाऱ्यानुसार चालवू शकतो.

अखेर खरा धर्म कशात साठविलेला आहे? रोजच्या संसारातील साऱ्या सुखदु:खांच्या पलिकडे पोचून आणि नित्याच्या ऐहिक जीवनातील सारे प्रश्न मागे टाकून मानवाच्या पूर्णत्त्वाचा शोध घेणे, शाश्वत आणि चिरंतन अशा तत्त्वांचा साक्षात्कार प्राप्त करुन घेणे यासाठी धर्म आहे. बुद्धीने आणि मनाने, विचाराने आणि भावनेने माणसाला किती व्यापक होता येईल ते पाहण्याचा धर्माचा प्रयत्न आहे. शेवटी आचरणात जेवढा उतरला तेवढाच तो धर्म समजला असे म्हणावे लागते.

खऱ्या अर्थाने धर्मशील व्हायचे तर केवळ धर्माचा वरवरचा तपशील माहित होणे किंवा नुसती तत्त्वे जाणणे पुरेसे नाही. त्यासाठी आत्मा जाणून घेण्याचे सामर्थ्य असावे लागते. सर्व संशयांचा, शंकांचा निरास होतो. तसे झाल्यावर आपली आणि ईश्वराची समोरासमोर भेट होते.

शुद्ध तात्विक दृष्टीने पाहिल्यास परमार्थात पूर्णत्त्व असे नसतेच. कारण जे परमात्म तत्त्व अनंत आहे, त्याचा अंत आपण पाहिला असे कोणीही म्हणू शकणार नाही. दोन समांतर रेषा जशा कोठेही मिळत नाहीत त्याप्रमाणे परमार्थातील पूर्णत्त्वाची स्थिती आहे. म्हणूनच पौर्णिमेचा चंद्र व चतुर्दशीचा चंद्र याप्रमाणे ब्रह्म व ब्रह्म होणारा यांत फरक राहतोच.

परमार्थाच्या पायऱ्या अशा आहेत -

१. Incentive to Spiritual Life - परमार्थासाठी प्रेरक कारणे.

२. Necessity of moral Preparation - विशुद्ध नैतिक जीवनाची

आवश्यकता.

३. Relation of God with Saints - देव आणि भक्त यांचे संबंध.

४. Beginning of the pilgrimage - साधना मार्गाचा आरंभ.

५. The Highest ascent - साक्षात्कार.

गुरुदेव रानडे यांनी स्वत:चा अनुभव श्रेष्ठ म्हणजे प्रमाण मानला. परमार्थात भाव सर्वश्रेष्ठ असून तेहि भाविकच होते. परंतु भाव या शब्दाचा त्यांचा अर्थ रुढ अर्थाहून निराळा होता. त्यांच्या दृष्टीने भाव म्हणजे देवाविषयी वाटणारे प्रेम, कळवळा, श्रद्धा नव्हे. भाव हा प्रत्यक्ष अनुभव आल्यावाचून उत्पन्न होत नसतो. म्हणून प्रचीतीला काय येते ते पहा व तेवढेच खरे माना असे रामदासाप्रमाणे त्यांचे मत होते. नामस्मरण हे भाव निर्माण करणारे साधन आहे. देवाचा अनुभव येवो किंवा न यवो, देवाचे नाम सतत स्मरणे हा खरा भक्तीचा मार्ग.

‘लपलासि तरी नाम कोठे नेशी

आम्ही अहर्निशी नाम गाऊ’

हा नामदेवांचा अभंग म्हणूनच महत्त्वाचा. हा भाव निर्माण व्हावा व तो वाढत राहावा; विवेक, नामस्मरण, परमार्थश्रवण, सत्संग ही साधने भाव टिकविण्यास उपयोगी पडतात. साधनाचा जोर वाढत राहिला तर देवाची कृपा आपोआप होईल. ज्याक्षणी साधकाचा भाव तीव्रतम होईल, त्याक्षणी अनुभव येईल. ईश्वराचा साक्षात्कार हा दीर्घकाल साधन करण्यावर अवलंबून नाही. साक्षात्कारासाठी अंत:करणाचे मार्दव व देवाविषयी कळवळा असावा लागतो. तो असल्यावर देव दूर नाही. देवा! अशी खरी आर्त हाक आतून आली पाहिजे. यासाठीच तर साधन व भक्ती यांची Quality लागते हे खरेच!

## दुर्वांची जुडी

विघ्नहर्त्याला २१ दुर्वांची जुडी वाहतात. माझ्या ह्या लेखांतील हा शेवटचा २१ वा लेख म्हणजेच त्या दयाघन परमात्म्याला वाहिलेली २१ दुर्वांची जुडीच जणू! पूर्णतेचं समाधान आहे. हे लेख लिहिण्यात केवळ स्वर्गीय आनंद लाभला. दिव्य जीवनाचा झरा पदोपदी दृष्टीस पडला. त्याचा लाभ वाचकांनी घ्यावा हीच माफक अपेक्षा.

थोडेसे सिंहावलोकन केले तर ते अनाठायी ठरणार नाही. अवतार मेहेरबाबांच्या शब्दात सांगायचे तर :

‘मंझिल मिली, मुराद मिली, मुदुआ मिला

सब कुछ मुझे मिला, जो तेरा नक्षे पा मिला.’

म्हणजे,

मी माझ्या इष्ट स्थळी पोहोचलो. माझ्या हृदयीच्या आशा आकांक्षा पूर्ण होऊन मी विजयी झालो. माझ्या इच्छा पूर्तिचा उद्देश सफल झाला. खरेच, तुझ्या

पाऊलखुणा सांपडताच, मला हवे ते सर्व मी मिळविले.

आत्मा हा चेतनेच्या द्वारा मनाला अनुभवतो. आणि मनाच्या द्वारे शरीर व विश्वसृष्टी जाणतो. जोवर मन व शरीर अस्तित्त्वात आहे तोवर आत्मा अनुभव घेत रहातो व जेव्हा मन व शरीर अस्तित्त्वात राहत नाहीत तेव्हा आत्मा अलिप्त राहतो. तरीही तो प्रत्येकात असतोच.

ईश्वर हा - या प्रत्येकात आहे.

१. आत्मा जो सर्वांपासून अलिप्त आहे. त्रिभुवनांपासून अलिप्त.

२. चेतना सर्वत्र भरुन आहे. All pervading.

३. मन (जे प्रत्येकात असते).

४. शरिर (जे अतिमर्यादित / स्वरुपात)

कबीर म्हणतो -

एक राम दशरथाच्या घरी पाळण्यात झोके घेत पडला आहे - शरीर (मर्यादित)

एक राम प्रत्येक मनाच्या द्वारे बोलतो आहे - मन (प्रत्येकांत)

एक राम समग्र विश्वसृष्टीचा पसारा आहे - चेतना (All pervading)

एक राम त्रिभुवनापासून अलिप्त आहे - आत्मा (अमर्याद)

कार्यरत मन शरीर व विश्वसृष्टी पहाते.

या मनाला स्वत:च्या एकाग्रतेच्या प्रक्रियेतून जाणे भाग आहे.

क्रमाक्रमाने स्वत:ची एकाग्रता वाढवीत मर्यादित मन आपली मर्यादा झुगारुन देऊ शकते व त्याचा पायरी पायरीने उच्च - उच्चतर - उच्चतम अनुभव येत जातो. जसजशी मनाची एकाग्रता वाढत जाते तसतशी त्याची ज्ञानभूमिकांमध्ये अधिकाधिक प्रगती होत जाते. व जेव्हा ही प्रगती कळसाला पोहोचते तेव्हा मनाचा कार्यलोप होऊन ते पूर्ण बंद पडते. त्याक्षणी ते ईश्वराचा अनुभव घेऊ शकते. हाच आत्मानुभव. हीच निर्विकल्प समाधी. मनाचे सामर्थ्य हे असे अफाट आहे. पायरीपायरीने प्रत्येकजण या अवस्थेचा आत्मानुभव घेऊ शकतो. ही परम आनंदाची अनुभूती. हाच दिव्य आनंदाचा खरा स्त्रोत.

आपण पाहिले की, उत्तम संकल्पाने जी उत्तरोत्तर माणसाच्या हातून सत्कर्मेच घडत जातात, त्यामुळे मनाचे सामर्थ्य वाढत जात असते. The only two essentials are faith and self surrender to God.

यासाठी -

‘असतो मा सद्‌गमय

तमसो मा ज्योतिर्गमय

मृत्योर्मा अमृतंगमय’

हा प्रवास म्हणजेच जणू जीवन यात्राच. तीच जीवननिष्ठा व्हावी.

यासाठी प्रत्येकाने आपले मन कुंवार (Virgin) ठेवावे. म्हणजे आपले स्वस्थचित्त मन विषयांपासून दूर ठेवावे. या करिता चांगले संकल्पच बुद्धीने करायला हवेत. अभिलाषा व कामना दूर ठेवून केलेली कर्मे भगवंताला अर्पण करावयाची व फलाची अपेक्षा करायची नाही. यासाठी मन व बुद्धी पद्धतशीर शिक्षण घेऊन पुष्ट केलेली असली पाहिजे. केवळ निर्भय बनावे. मी देहरुपी नसून अविनाशी सच्चिदानंद स्वरुपी आहे हे दृढ ज्ञान ठसावे. दैवी जीवन म्हणजे एक अखंड साधना आहे व या साधनेची सुरुवात आपल्या इंद्रियाला वळण लावण्यापासून होते, हे प्रथम ध्यानी घ्यावे. विवेकी पुरुषांनी मौज म्हणून देखील इंद्रियांचे लाड करु नयेत. इंद्रिये प्रथम जिंकली पाहिजेत. कामाला इंद्रियातून हाकलून दिले पाहिजे. मग मनाची धाव थांबेल व पुढचा मार्ग आत्मसुखाचाच राहिल.

सुखी जीवना इतकेच गुणवत्तेचे चांगले जीवन असणे महत्त्वाचे. ईश्वराची सेवा व चिंतन केल्याने मनोवृत्ती कोमल बनते. निष्ठा उत्पन्न झाली की भक्तीचा परिपक्व भाव ईश्वरचरणी अर्पण करता येतो. ईश्वरावरील प्रेम यातूनच निर्माण होते. सेवा, चिंतन, निष्ठा, भक्ती, भाव, प्रेम अशा परमेश्वर प्राप्तीच्या चढत्या पायऱ्या आहेत. आपण एकेक पायरी, पायरी चढत जावे, वरपर्यंत. अशाप्रकारे कणाकणात भगवंताचा अनुभव घ्यावा व धन्य व्हावे!

तुम्हीच स्वयंदीप व्हा! आपल्या स्वत:सही आपणच प्रकाश व्हा! To be a light of oneself हा संदेश लक्षात ठेवा!

परमेश्वर आपल्या जवळच सत्तारुपात आहे ही जाणीव सतत जागृत ठेवावी. भगवंताच्या नावानेच भगवंताची प्राप्ती होणार असते व यासाठी निष्ठेचे नाम उपयोगी पडते.

गुरु चरणी अत्यंत विश्वास

आणि साधनाचा अखंड सहवास

येथे प्रपंचाचा सुटला फास

हा परमार्थाचा मार्ग आहे खास!

आपण का जगतो याचा आत्मानात्म विवेक प्रत्येकाने केला पाहिजे. चांगले जीवन जगण्यासाठी निग्रह (resolution), दृढ विश्वास (conviction) व निश्चय (determination) या पायऱ्या प्रगतीसाठी आहेत. तसेच जे जन्मते ते नाश पावणार हे ध्यानी ठेवावे. याकरिता भीतीची व असुरक्षिततेची भावना घालविली पाहिजे.

You can have protection

of the Devine Name,

all the time,

if you totally surrender to God.

जे जे भव्य, उदात्त आहे,

ते ते ईश्वरीय आहे.

यासाठी सुंदर जगता यावे.

सुंदर जगणे म्हणजे देवत्त्व.

ईत्यलम्!

## संदर्भसूची


१. श्री. रामकृष्ण परमसंस Gospel by M.

२. Works of Vivekanand Vol. I to VIII - स्वामी विवेकानंद

३. Inspired talks of Vivekanad

४. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज - के. इ. बेलसरे

५. गोंदवलेकर महाराजांची प्रवचने - गो. सी. गोखले

६. आनंद साधना - के. वि. बेलसरे

७. अध्यात्म संवाद भाग १ ते ४ - प्रा. म. वि. केळकर

८. श्री. समर्थ हृदय - शं. श्री. देव

९. भावार्थदीपिका - सोनोपंत दांडेकर

१०. ज्ञानेश्वरी - एक शोध - डॉ. उषा माधव देशमुख

११. एक तरी ओवी अनुभवावी - डॉ. करंदीकर व डॉ. इनामदार

१२. आत्मानंदाचे तत्त्वज्ञान - ग. वि. तुळपुळे

१३. सार्थ श्री. अमृतानुभाव - विवरण - विष्णु नरसिंह जोग

१४. दासबोध - के. वि. बेलसरे

१५. श्री. एकनाथांचे तत्त्वज्ञान - ग. वि. तुळपुळे

१६. गीतेच्या गाभाऱ्यात - राम केशव रानडे

१७. तुलसीदल - पांडुरंगशास्त्री आठवले

१८. एका भाविकाची भावयात्रा - मधुकर राऊत

१९. एका शेवटाची सुरुवात - सुधीर थत्ते

२०. चालविसी हाती धरोनिया - चंद्रकांत अनंत भोसेकर

२१. माझे आत्मचरित्र - प्रा. सुमती भोसेकर

२२. ईश्वरवचन - अवतार मेहेरबाबा

२३. ईश्वराच्या हस्ताक्षरात - अवतार मेहेरबाबा

२४. अंतरीचा मागोवा - गो. कं. प्रधान

२५. मानवोपनिषद - पु. य. देशपांडे

२६. आत्माराम - के.वि. बेलसरे

२७. कृष्णनुं जीवन संगीत - गुणवंतभाई शाह

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत
ई साहित्य प्रतिष्ठान